# महाराष्ट्र विधानपरिषद

## पहिले अधिवेशन, २०२६

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**सोमवार, दिनांक ०९ मार्च, २०२६ / फाल्गुन २०, १९४७ (शके)**

| | | |
|---|---|---|
| **(१)** | **मुख्यमंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |
| **(२)** | **उप मुख्यमंत्री** | |
| **(३)** | **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** | |
| **(४)** | **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** | |
| **(५)** | **अन्न व औषध प्रशासन, विशेष सहाय्य मंत्री** | |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ४९**

---

### नाशिक मधील विकासकांनी गृहनिर्माण प्रकल्पातील म्हाडाच्या हिश्श्यातील सदनिका आणि भूखंड देण्यास विरोध केल्याबाबत

**(१) * ६८५८ श्री.प्रसाद लाड, श्री.प्रविण दरेकर, श्रीमती उमा खापरे, श्रीमती चित्रा वाघ, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने आर्थिकदृष्ट्या दुर्बल व अल्प उत्पन्न वर्गातील गटांना खाजगी विकासकाच्या प्रकल्पात परवडणाऱ्या किमतीमध्ये सदनिका उपलब्ध व्हावी यासाठी २०% सर्व समाज योजना लागू केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजनेंतर्गत ४००० चौरस मीटरपेक्षा मोठ्या गृहनिर्माण प्रकल्पांमध्ये विकासकांना एकूण क्षेत्रफळाच्या २०% जागा आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक (EWS) आणि अल्प उत्पन्न गटासाठी (LIG) परवडणाऱ्या सदनिकांसाठी राखून ठेवाव्या लागतात आणि त्याबदल्यात विकासकांना २०% अतिरिक्त FSI (फ्लोअर स्पेस इंडेक्स) मिळतो, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नाशिक मधील ४९ विकासकांनी सदर योजनेंतर्गत गृहप्रकल्प वगळण्यासाठी भूखंडाचे विभाजन केले असून म्हाडाच्या हिश्श्यातील सदनिका आणि भूखंड देण्यास विरोध केला असल्याबाबत म्हाडा प्राधिकरण, नाशिक यांच्याकडून दिनांक २ जानेवारी, २०२५ रोजीच्या पत्रान्वये नगरविकास विभागास कळविलेले असून, नगरविकास विभागाकडून संचालक, नगर रचना महाराष्ट्र राज्य, पुणे व नाशिक महानगरपालिका यांच्याकडून अहवाल प्राप्त करून पुढील कार्यवाही करण्याचे प्रस्तावित केले होते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर दोन्ही कार्यालयांकडून शासनास अहवाल प्राप्त झाला आहे काय व उक्त अहवालानुसार शासनाने विकासकांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येणार आहे,
(५) असल्यास, समाजातील आर्थिक दुर्बल घटकांना खाजगी विकासकांच्या प्रकल्पातील सदनिका परवडणाऱ्या दरात उपलब्ध व्हाव्यात, शहरात सर्वसमावेशक विकास साधला जावा याकरीता सदर योजनेची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) व (२) एकात्मिक विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली-२०२० (UDCPR) मधील कलम ३.८.२ सर्वसमावेशक गृहनिर्माण (Inclusive Housing) मधील तरतूदीनुसार १० लाख व त्यापेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या महानगरपालिका हद्दीतील ४००० चौ.मी. पेक्षा जास्त क्षेत्राच्या भूखंडावरील प्रस्तावांकरीता निव्वळ भूखंड क्षेत्राच्या किमान २०% बांधकाम क्षेत्र किंवा भूखंड किंवा सदनिका आर्थिक दृष्टया दुर्बल घटक व अल्प उत्पन्न गट घटकांसाठी वितरित करण्याची तरतूद आहे.
(३), (४) व (५) नाशिकमध्ये भूखंडाच्या विभाजनाच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी, नाशिक यांनी अप्पर जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली ७ सदस्यीय समिती स्थापन केली होती. सदर समितीने त्यांचा अहवाल दिनांक ०७/१०/२०२५ च्या पत्रान्वये महसूल विभागास सादर केला आहे.

एकात्मिक विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली-२०२० आर्थिक दृष्टया दुर्बल घटक व अल्प उत्पन्न गट घटकांसाठी जागा देण्यात येणाऱ्या विकासकांना एकात्मिक विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीमधील तरतूदीनुसार FSI/TDR देण्याबाबत महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाने नगरविकास विभागास दिनांक ०२/०१/२०२५ च्या पत्रान्वये कळविले आहे. त्यानुषंगाने नगरविकास विभागामार्फत संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे अभिप्राय घेऊन कार्यवाही करण्यात येत आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## समता नगर, कांदिवली (पूर्व) येथील म्हाडा गृहनिर्माण संस्थेच्या इमारतींचा पुनर्विकास करण्याबाबत

**(२) * ६८३१ श्री.श्रीकांत भारतीय :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) समतानगर, कांदिवली (पूर्व) येथील म्हाडा गृहनिर्माण संस्थेमध्ये २२ मध्यम उत्पन्न गट (MIG) इमारतींमध्ये सुमारे ४४० कुटुंबे वास्तव्यास असून त्यात बहुसंख्य वृध्दांचा समावेश असून सदर संस्थेच्या इमारतींच्या पुनर्विकासासाठी सन २०१७ मध्ये विकासकांसमवेत करार करण्यात येऊनही अद्यापपर्यंत कोणत्याही प्रकारचे बांधकाम सुरू करण्यात आले नसल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकल्प गत आठ वर्षांपासून प्रलंबित ठेवून वेळेवर भाडे न देणे, वार्षिक भाडेवाढ न करणे तसेच पुनर्विकासाचे काम सुरू न केल्यामुळे विकासकाने करारातील अटींचे उल्लंघन केल्याने संस्थेच्या सभासदांनी प्रशासनाकडे पाठपुरावा केला असूनही तसेच गृहनिर्माण प्राधिकरणाकडे म्हाडा प्रशासनाने संबंधित विकासकांविरुद्ध तक्रारी करुनही विभागाने सदर प्रकरणी दुर्लक्ष केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदनिका धारकांना थकित भाडे देणे, भाडेवाढ करणे तसेच पुनर्विकासाचे काम सुरू करून त्याबाबतच्या कामाचा नियोजन अहवाल मुंबई गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळ कार्यालयास सादर करण्याबाबतचे निदेश शासनाने दिले आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर इमारतींच्या पुनर्विकासास विकासकाकडून झालेला विलंब पहाता सभासदांनी मागणी केल्याप्रमाणे म्हाडाने दिलेली सर्व प्रमाणपत्र रद्द करून नवीन सक्षम विकासक नेमण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) असल्यास, समतानगर येथील इमारतींची झालेली दुरवस्था, रहिवाशांची वाढती संख्या, आवश्यक मूलभूत सोयी-सुविधांचा अभाव व रहिवाशांची सुरक्षितता इ. बाबी विचारात घेता म्हाडाच्या सदर २२ इमारतींचा तातडीने पुनर्विकास करण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

समतानगर वसाहतीमधील १६० इमारतींमध्ये २९६ अत्यल्प उत्पन्न गटाच्या, १४८८ अल्प उत्पन्न गटाच्या, ७०० मध्यम उत्पन्न गटाच्या व २४० उच्च उत्पन्न गटाच्या अशा एकूण २७२४ सदनिका आहेत. त्यापैकी अत्यल्प उत्पन्न गटाच्या २९६, अल्प उत्पन्न गटाच्या १४८८ व मध्यम उत्पन्न गटाच्या ४० अशा एकूण १८२४ पुनर्वसन सदनिकांचे काम पूर्ण झाले असून त्यास भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त झाले आहे. उर्वरीत ६६० मध्यम उत्पन्न गटाच्या व २४० उच्च उत्पन्न गटाच्या सदनिकांच्या पुनर्विकासाचे काम अद्याप सुरु झालेले नाही.
(२) मध्यम उत्पन्न गटाच्या २२ सह. गृह. संस्थांनी त्यांच्या इमारतींच्या पुनर्विकासाचे काम सुरु न झाल्याबाबत तक्रार केल्याच्या अनुषंगाने मुख्य अधिकारी, मुंबई मंडळ यांच्याकडे दिनांक ३१/०५/२०२३ रोजी तसेच उपाध्यक्ष, म्हाडा यांच्याकडे दिनांक ०६/०२/२०२४ व दिनांक १८/०३/२०२४ रोजी सुनावण्या आयोजित करण्यात आल्या होत्या. सदर सुनावणीत विकासकास मध्यम उत्पन्न गटांच्या पुनर्विकासाचे काम सत्वर सुरु करण्याबाबत व पुनर्विकासाबाबत कालबद्ध कार्यक्रम सादर करण्याबाबतचे निर्देश दिले होते.
(३), (४) व (५) मध्यम उत्पन्न गटाच्या २२ सह. गृह. संस्थांपैकी १२ सह. गृह. संस्थांनी दिनांक ०५/०२/२०२५ रोजीच्या विशेष सर्वसाधारण सभेमध्ये विकासक मे. एस.डी.कार्पोरेशन प्रा. लि. यांची विकासक म्हणून नियुक्ती रद्द करण्यात येत असल्याबाबतचा ठराव मंजूर केला असल्याचे म्हाडास कळविले आहे.

सदर विषयाबाबत मा.राज्यमंत्री (गृहनिर्माण) यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ३०/०७/२०२५ रोजी बैठक आयोजित करण्यात आली होती. बैठकीअंती मा.राज्यमंत्री (गृहनिर्माण) यांनी, पुढील तीन वर्षाचे आगाऊ भाडे जमा करून मूळ सभासदांना अदा करण्याबाबत तसेच, पुनर्वसित इमारतीचे बांधकाम तातडीने सुरू करण्यात यावे. त्यासाठी आवश्यक त्या परवानग्या देण्याची कार्यवाही म्हाडा स्तरावर ठराविक मुदतीत करण्यात यावी, पुनर्वसित इमारतीचा बांधकाम कालावधी तीन वर्ष विहित करून मूळ सभासदांना त्याप्रमाणे

अवगत करण्यात यावे. तसेच विहित कालावधीत पुनर्वसित इमारतीचे बांधकाम पूर्ण करून मूळ सभासदांना घरांचा ताबा मिळण्याच्या अनुषंगाने संबंधित विकासकासोबत करार, बंधपत्र इत्यादी आवश्यक कार्यवाही म्हाडाने त्यांचे स्तरावर करावी, असे निर्देश दिले आहेत.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईतील बेस्ट बसेसचे वाढते अपघात रोखण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत

**(३) * ६५६४ श्री.सुनिल शिंदे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.राजेश राठोड, श्री.अभिजित वंजारी, श्री.धीरज लिंगाडे, श्री.जयंत आसगावकर, श्री.सुधाकर अडबाले, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, श्री.विक्रांत पाटील, श्री.सदाशिव खोत, श्री.संजय केणेकर, श्रीमती उमा खापरे, श्री.अमोल मिटकरी, श्री.विक्रम काळे, श्री.शिवाजीराव गर्जे, श्री.इद्रिस नायकवडी, श्री.सतिश चव्हाण, श्री.शशिकांत शिंदे, श्री.सत्यजीत तांबे, ॲड.अनिल परब :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई उपनगरातील भांडूप रेल्वे स्थानकाच्या बाहेर भरधाव बेस्ट बसने पादचाऱ्यांना धडक दिल्याने चार जणांचा मृत्यू तर १४ हून अधिक जण गंभीर जखमी झाल्याची घटना दिनांक २९ डिसेंबर, २०२५ रोजी वा त्यासुमारास घडली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बस चालकाला पोलिसांकडून ताब्यात घेण्यात आले असून बेस्ट उपक्रमातर्फे देखील या अपघाताची चौकशी करण्यात येणार असून, सदर अपघातातील आरोपी चालकावर मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्यात येणार आहे काय, अपघातातील मृत व्यक्तींच्या कुटुंबियांस शासनाकडून रुपये ५ लाख तर बेस्ट उपक्रमामार्फत रुपये २ लाख देण्याचे जाहीर करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मुंबईत माहे डिसेंबर, २०२५ मध्ये झालेले बसेसचे अपघात पाहता बेस्ट उपक्रमातील चालकांकडून नियमांचे सर्रास उल्लंघन केले जात असल्याची बाब निदर्शनास आली असून सन २०२२ ते २०२४ या तीन वर्षांत अपघात, गैरहजेरी, उद्धट वर्तणूक आदी प्रकरणांमध्ये बेस्ट उपक्रमाने ८१८ बस चालकांना बडतर्फ केले असून २ हजार १९२ चालकांना निलंबित केले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, बेस्ट बसेसच्या दुर्घटना टाळण्यासाठी सार्वजनिक वाहतुकीच्या सुरक्षिततेकडे अधिक लक्ष देण्याची मागणी नागरिकांकडून होत असून या दुर्घटनेनंतर चालकांच्या प्रशिक्षणातील त्रुटी, इलेक्ट्रिक बसची कार्यपद्धत आणि मानवी चूक याकडे लक्ष वेधून प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी बेस्ट प्रशासनाने इलेक्ट्रिक बस चालकांना विशेष प्रशिक्षण देण्याचा निर्णय घेतला आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, सदर अपघातातील जखमी व्यक्तींना वैद्यकीय मदत व मृत व्यक्तींच्या वारसदारांस आर्थिक मदत व शासकीय सेवेत सामावून घेण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) असल्यास, मुंबईमध्ये गर्दीच्या ठिकाणी मोठ्या बसेसऐवजी लहान बसेस (Mini Buses) वापरुन चालकांसाठी विशेष प्रशिक्षण अनिवार्य करण्याबाबत धोरणात्मक सुधारणा करण्याच्यादृष्टीने तसेच, बेस्ट प्रशासनाच्या उदासीन कामकाजामुळे बेस्टच्या प्रवाशांची आणि पादचाऱ्यांची सुरक्षा धोक्यात येत असून बेस्ट बसेसचे वाढते अपघात रोखण्याकरिता प्रभावी अंमलबजावणी करण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे अंशत: खरे आहे.

मुंबई उपनगरातील मध्य रेल्वेच्या भांडुप (पश्चिम) स्थानक परिसरात दिनांक २९ डिसेंबर, २०२५ रोजी सदर अपघात झाला. यामध्ये ४ व्यक्तींचा मृत्यू झाला व १० व्यक्ती जखमी झाल्या आहेत.

(२) हे खरे आहे.

अपघातानंतर बेस्ट प्रशासनाद्वारे सहाय्यक महाव्यवस्थापक (परि.अभि.) यांच्या अध्यक्षतेखाली पाच सदस्यीय समिती गठीत करण्यात आली. सदर चौकशीच्या अंती हा अपघात बसचालकाच्या निष्काळजीपणामुळे तसेच बेजबाबदार व सदोष वाहन चालन पद्धतीमुळे झाला असल्याचे निदर्शनास आले आहे.

अपघातानंतर पोलीस प्रशासनाव्दारे कारवाई करून बसचालकास अटक करण्यात आली आहे. सदर प्रकरण सद्य:स्थितीत न्यायप्रविष्ट आहे.

या अपघातातील मृत व्यक्तींच्या कायदेशीर वारसास शासनाकडून ५ लाख रुपये तर बेस्ट उपक्रमातर्फे २ लाख रुपये देण्याचे जाहीर करण्यात आले आहे.

(३) अंशत: खरे आहे.

सन २०२२ ते २०२४ या तीन वर्षामध्ये अपघाताच्या कारणास्तव बेस्ट उपक्रम व भाडेतत्वावरील बसपुरवठादार व्यवसाय संस्था यांच्या ५८ बसचालकांवर बडतर्फीची तर एकूण ६०३ बसचालकांवर निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे.

तसेच इतर कारणास्तव २०२२ ते २०२५ या कालावधीत बेस्ट उपक्रमाच्या ६३ बसचालकांवर बडतर्फीची तर एकूण ८७६ बसचालकांवर निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे.

(४) बेस्ट उपक्रमाद्वारे भविष्यात होणारे अपघात टाळण्याकरीता उपक्रमाद्वारे बेस्ट बसचालकांना ईलेक्ट्रीक बसगाड्यांवरील बसचालनाचे प्रशिक्षण देण्याकरीता उजळणीवर्गाचा कालावधी वाढविण्यात आला असून २०० बसचालकांना प्रायोगिक तत्वावर बसगाडी चालविण्याचे प्रशिक्षण देणाऱ्या अद्ययावत प्रणालीवर (Simulator) प्रशिक्षण देण्यात आले आहे.

वाहतूक व अभियांत्रिकी विभागाच्या अधिकाऱ्यांच्या समन्वयाने मार्गावरील बसचालकांची वाहनचालन पद्धती तपासून त्यानुसार सदोष बसचालकांवर योग्य ती कार्यवाही करण्यात येते.

(५) अपघातानंतर बेस्ट उपक्रमाव्दारे तातडीने अपघातग्रस्त व्यक्तींना उपचारार्थ नजीकच्या सरकारी अथवा खाजगी रुग्णालयात तातडीने दाखल करुन, उपचारादरम्यान झालेल्या खर्चाची प्रतिपूर्ती बेस्ट उपक्रमाव्दारे करण्यात आली.

शासनाच्या धोरणानुसार सदर अपघातातील मृत व्यक्तींच्या कायदेशीर वारसास प्रत्येकी रुपये ५ लाख याप्रमाणे एकूण रुपये २० लाख इतके अर्थसहाय्य मुख्यमंत्री सहाय्यता कक्षातून मंजूर केले असल्याचे शासनाच्या दिनांक ०३ फेब्रुवारी, २०२६ च्या पत्रान्वये जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांना कळविण्यात आले आहे. बेस्ट उपक्रमामार्फत सदर अपघातात मृत झालेल्या व्यक्तींच्या कायदेशीर वारसदारांना रुपये २ लाख एवढी आर्थिक मदत देण्यासाठी बेस्ट उपक्रमाने समिती नेमलेली असून समितीच्यावतीने अपघातातील मृतांचे कायदेशीर वारसदार पडताळणी करुन मदत देण्याची कार्यवाही सुरु आहे.

(६) सद्य:स्थितीत बेस्ट उपक्रमाच्या ९०६ मिडी बसगाड्या मुंबई शहरातील कमी रुंदीच्या रस्त्यावर प्रवर्तित करण्यात येत आहेत. तसेच पी.एम.ई-ड्राईव्ह योजनेतंर्गत १५०० मिडी गाड्या व या व्यतिरिक्त २०० मिडी गाड्या याप्रमाणे एकूण १७०० मिडी गाड्या बसताफ्यात समाविष्ट करण्याकरीता निविदा प्रक्रिया सुरु आहे.

बेस्ट उपक्रमाच्या स्वमालकीच्या तसेच भाडेतत्वावरील बसगाड्यांवर नियुक्त बसचालकांना विशेषत: इलेक्ट्रिक बसगाड्या चालविण्याबाबतचे प्रशिक्षण देण्यात येत आहे. प्रशिक्षणादरम्यान सर्व बसचालकांना इलेक्ट्रिक बसगाडी चालविताना घ्यावयाच्या विशेष खबरदारीबाबत सूचना देण्यात येत असून याबाबत जनजागृती करण्यात येत आहे.

(७) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सिंदेवाही (जि.चंद्रपूर) तालुका क्रीडा संकुलाची प्रलंबित कामे पूर्ण करण्याबाबत

**(४) * ७२०६ श्री.अभिजित वंजारी, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, श्री.जयंत आसगावकर, श्री.राजेश राठोड :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंदेवाही (जि.चंद्रपूर) येथे गाव तिथे तालुका क्रीडा संकूल या धोरणानुसार गडमौसी गावाजवळ घनदाट जंगल परिसरात तालुका क्रीडा संकूल तयार होवून सुध्दा वाघ व अन्य जंगली प्राण्यांच्या भितीने स्थानिक खेळाडू या क्रीडा संकुलामध्ये सराव करण्यास तयार नसल्याने सदर संकुलाचा उपयोग होत नसल्याचे माहे जानेवारी, २०२६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रशासन व क्रीडा अधिकारी यांच्या दुर्लक्षितपणामुळे सदर क्रीडा संकुलाचे काम प्रलंबित असून संकुलापर्यंत जाण्याकरीता पथदिव्यांची व्यवस्था नसून क्रीडा संकुल जंगलाजवळ असल्यामुळे संरक्षक भिंतीची आवश्यकता आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, क्रीडा संकुलात बास्केट बॉल खेळण्याकरीता सिमेंट कोर्ट नसून क्रीडा संकुलाला लागून अनेक शासकीय व औद्योगिक कार्यालये, भात केंद्रे असून निधी अभावी सदर क्रीडा संकुलाचे अंतर्गत कामकाज गत पाच वर्षांपासून प्रलंबित असून क्रीडा संकुलाची कामे त्वरित सुरु करावी अशी मागणी क्रीडा मंडळ व खेळाडूंनी केली असून, सदर मागणी पूर्ण करण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, सिंदेवाही तालुक्यातील अनेक गावांमध्ये मागील अनेक वर्षांपासून सातत्याने वाघांचे हल्ले होत असताना सुध्दा संबंधित अधिकाऱ्यांनी शासनाची दिशाभूल करून व कोट्यवधी रक्कम खर्च करून सदर क्रीडा संकूल उभारले असल्याने शासनाची दिशाभूल व फसवणूक करणाऱ्या संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) असल्यास, शासनाने सदर प्रकरणी दखल घेऊन सिंदेवाही (जि.चंद्रपूर) येथील तालुका क्रीडा संकुलाची प्रलंबित कामे पूर्ण करण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती सुनेत्रा पवार :** (१) हे खरे नाही.

तालुका क्रीडा संकूल सिंदेवाही (जि.चंद्रपूर) ची निर्मिती २०१० या वर्षी करण्यात आली असून सदर क्रीडा संकूलातील बॅडमिंटन हॉलचे बांधकाम पूर्ण झालेले असून बॅडमिंटन हॉलमध्ये खेळाडू नियमित सराव करीत आहेत. नवीन प्रशासकीय मान्यतेनुसार हॉकी ॲस्ट्रोटर्फ व ४०० मी. धावनपथाचे बांधकाम

प्रगतीपथावर आहे. सिंदेवाही गावापासून तालुका क्रीडा संकूल फक्त १ कि.मी. अंतरावर असून डांबरी रस्त्याने जोडलेले आहे. खेळाडू, क्रीडाप्रेमी व निसर्गप्रेमी यांना संकुलाकडे जाण्या-येण्यास कोणतीही अडचण नाही.

(२) हे खरे नाही.

तालुका क्रीडा संकूल, सिंदेवाही (जि.चंद्रपूर) ला संरक्षण भिंत व लोखंडी जाळी लावण्यात आलेली आहे. अतिवृष्टीमुळे समोरील ३० मी. जुनी संरक्षक भिंत कोसळल्यामुळे सदर भिंत बांधकामाकरीता आराखडे व अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. तांत्रिक मान्यतेनंतर डी.पी.सी. कडे प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

(३) तालुका क्रीडा संकूल सिंदेवाही (जि.चंद्रपूर) येथे बॅडमिंटन हॉल, संरक्षण भिंत व बॉस्केटबॉल करीता सिमेंट फ्लोरिंग चे काम हाती घेण्यात आले होते. सदर सिमेंट फ्लोरिंग अद्यावत करुन खेळाडूंना नियमित बॉस्केटबॉल या खेळाचा सराव करण्याकरीता संकुल समितीमार्फत मुव्हेबल बास्केटबॉल पोल खरेदी करुन खेळाडूंची व्यवस्था करण्यात येत आहे.

(४) हे खरे नाही.

(५) तालुका क्रीडा संकुल सिंदेवाही (जि.चंद्रपूर) च्या रुपये १०.०० कोटीच्या सुधारीत आराखडे व अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. त्यानूसार हॉकी ॲस्ट्रोटर्फ व ४०० मी. धावनपथाचे काम प्रगतीपथावर आहे. सदर सुधारीत अनुदान मर्यादेनुसार रुपये ३.०० कोटी निधी पैकी रुपये १.०० कोटी निधी वितरित करण्यात आला असून निधी उपलब्धतेनुसार विविध क्रीडा सुविधा तयार करण्यात येत आहेत.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## ठाणे शहरातील वागळे इस्टेट येथील डम्पिंग ग्राऊंड अन्यत्र स्थलांतरीत करण्याबाबत

**(५) * ७१२७ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.राजेश राठोड, श्री.अभिजित वंजारी, श्री.धीरज लिंगाडे, श्री.जयंत आसगावकर, श्री.सुधाकर अडबाले :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) स्मार्ट सिटी म्हणून विकसित होत असलेल्या वागळे इस्टेट (ठाणे) परिसरातील डम्पिंग ग्राऊंड हटविण्याची मागणी गत दोन ते तीन वर्षांपासून स्थानिक नागरिकांकडून होत असून ठाणे महानगरपालिका प्रशासनाचे याकडे दुर्लक्ष होत असल्याची बाब माहे डिसेंबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वागळे इस्टेट येथील डम्पिंग ग्राऊंड येथे गत २० वर्षांपासून कचऱ्याची समस्या उद्‌भवत असून ठाणे शहरातील कचरा जमा होऊन विलगीकरणाचे काम होत असताना मोठ्या प्रमाणात येथे कचऱ्याचे ढीग जमा होतात त्यामुळे डासांचा प्रादुर्भाव वाढून स्थानिक नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर परिसरामध्ये डम्पिंग गाड्यांची रांग लागत असल्यामुळे वाहतूक कोंडी होत असून, उघड्यावर कचऱ्याची वाहतूक केली जात असल्यामुळे संपूर्ण परिसरात कचऱ्याचा खच पडलेला दिसतो व वाहनातील कचरा बाहेर पडत असल्याने परिसरात दुर्गंधी पसरत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, नागरिकांचे आरोग्य सुरक्षित राहण्याकरीता सदर डम्पिंग ग्राऊंड अन्यत्र स्थलांतरित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे अंशतः खरे आहे.

ठाणे महानगरपालिका कार्यक्षेत्रात वागळे इस्टेट परिसरात सीपी तलाव येथे हस्तांतरण स्थानक कार्यरत आहे. सदर ठिकाणी संकलित करण्यात येणारा घनकचरा मौजे डायघर व मौजे आतकोली, ता.भिवंडी येथील कचरा पूर्व प्रक्रिया केंद्रावर वर्गीकरणासाठी/व्यवस्थापनासाठी नियमितपणे हस्तांतरित करण्यात येतो. सदरील हस्तांतरण स्थानक हटविण्यासाठी स्थानिक नागरिकांकडून मागणी करण्यात येते.
(२) हे खरे नाही.

सीपी तलाव येथील कचरा नियमित उचलण्यात येत असून, हस्तांतरण स्थानकातील घनकचऱ्याचा साठा दररोज शून्यावर आणला जात आहे. हस्तांतरण स्थानकातील घनकचऱ्यावर दैनंदिन दुर्गंधीनाशक व जंतुनाशकाची फवारणी करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे उच्च क्षमतेचे दुर्गंधीनाशक स्प्रेईंग मशीन, मिस्ट मशीन कार्यान्वित करण्यात येऊन प्रभावी दुर्गंधी प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यात आलेली आहे. त्यामुळे हस्तांतरण स्थानक परिसरातील नागरिकांच्या सार्वजनिक आरोग्याच्यादृष्टीने आवश्यक त्या सर्व उपाययोजना करण्यात आलेल्या आहेत.
(३) हे खरे नाही.

सद्य:स्थितीत शहरामध्ये विकेंद्रीत पद्धतीने चार ठिकाणी तात्पुरते हस्तांतरण स्थानक सुरु करण्यात आलेले असल्याने सीपी तलाव हस्तांतरण स्थानकात येणाऱ्या घंटागाड्यांचे व पर्यायाने घनकचऱ्याचे प्रमाण कमी झाले आहे. सीपी तलाव परिसरातील रस्ते अरुंद असल्याने वाहतूक कोंडी होऊ नये म्हणून विभागामार्फत हस्तांतरण स्थानकात येणाऱ्या व जाणाऱ्या वाहनांसाठी वेगवेगळे Entry व Exit मार्ग तयार करण्यात आलेले आहेत. वाहतुकीचे नियमन करण्यासाठी वाहतूक पोलीस व ट्रॅफिक वॉर्डनच्या मदतीने नियोजन करण्यात आलेले असून, सद्य:स्थितीत हस्तांतरण स्थानक परिसरात वाहतूक कोंडी होत नाही. तसेच, हस्तांतरण स्थानकातून निघणाऱ्या वाहनांमुळे परिसरात दुर्गंधी पसरु नये याकरीता हस्तांतरण स्थानकातून घनकचऱ्याचे वहन करणाऱ्या सर्व हुकलोडर्स, हायवा डम्पर्सचे टायर देखील महानगरपालिकेकडून धुण्यात येत आहेत.
(४) सीपी तलाव हस्तांतरण स्थानकात येणाऱ्या घनकचऱ्याचा ओघ कमी करण्यासाठी महानगरपालिका कार्यक्षेत्रात विकेंद्रित स्वरुपात चार ठिकाणी तात्पुरत्या स्वरुपात हस्तांतरण स्थानके कार्यान्वित करण्यात आलेली आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मोरवाडी (पिंपरी चिंचवड) येथील दिव्यांग भवनाचे अग्निसुरक्षा लेखापरिक्षण करण्याबाबत

**(६) * ७०९७ श्री.अमित गोरखे, श्रीमती उमा खापरे, श्री.सदाशिव खोत, श्रीमती चित्रा वाघ, श्री.प्रसाद लाड, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, श्री.विक्रांत पाटील :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील मोरवाडी (जि.पुणे) येथील दिव्यांग भवनाचे अग्निसुरक्षा लेखापरिक्षण (फायर ऑडिट) अद्याप प्रलंबितअसून, सदर लेखापरिक्षण तातडीने करावे अन्यथा भविष्यात काही दुर्घटना घडल्यास त्यास प्रशासनास जबाबदार धरले जाईल असा इशारा अपंग सेवक संघटनेने दिला असल्याची बाब माहे डिसेंबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर दिव्यांग भवन इमारतीत दररोज सुमारे २०० ते २५० दिव्यांग नागरिकांची ये-जा होत असते, त्यामुळे आपत्कालीन प्रसंगी दिव्यांगांना बाहेर काढण्यासाठी पर्यायी व्यवस्था उपलब्ध नसल्याने दिव्यांगांकडून नाराजी व्यक्त केली जात आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या दिव्यांग भवन इमारतीचे सुरक्षिततेच्यादृष्टीने फायर ऑडीट तातडीने करण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, दिव्यांगाच्या सुरक्षिततेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला असून प्रत्यक्षात मूलभूत त्रुटी असतानाही त्याकडे सदर महानगरपालिका प्रशासन जाणीवपूर्वक दुर्लक्ष करित असल्याने सदर प्रकरणी जबाबदार असणाऱ्या संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, दिव्यांग भवन फाऊंडेशन या इमारतीचे मे. इंडियाना या अधिकृत संस्थेमार्फत दिनांक ३१/०८/२०२५ रोजी अग्निसुरक्षा लेखापरिक्षण (फायर ऑडिट) करण्यात आले आहे.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## के.ई.एम. रुग्णालय, मुंबई येथील रक्त केंद्राच्या कामकाजात सुधारणा करण्याबाबत

**(७) * ७०१८ डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.कृपाल तुमाने :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या के.ई.एम. रुग्णालयातील रक्त केंद्राची (ब्लड बँक) अन्न व औषध प्रशासन तसेच केंद्रीय औषध मानक नियंत्रण संघटना (CDSCO) यांनी दिनांक ३० ऑक्टोबर, २०२५ रोजी केलेल्या संयुक्त तपासणीमध्ये अनियमितता निदर्शनास आली असून HIV संक्रमित रक्त अयोग्यरीत्या हाताळत असल्यामुळे सदर केंद्रास दुसऱ्यांदा कारणे दाखवा नोटीस दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, के.ई.एम. रुग्णालयात नियमित तपासणीसाठी आलेल्या एका गर्भवती महिलेला ती HIV संक्रमित असल्याचा चुकीचा रिपोर्ट दिल्यामुळे सदर महिलेने आत्महत्या केली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अन्न व औषध प्रशासन विभाग (FDA) व केंद्रीय औषध मानक नियंत्रण संघटना (CDSCO) यांचेकडून कारणे दाखवा नोटीस मिळाल्यानंतर के.ई.एम रुग्णालयाच्या रक्त केंद्राने संबंधितांना खुलासा सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर रुग्णालयातील रक्त केंद्राच्या कामकाजात सुधारणा करण्यात आली आहे काय, तसेच सर्वसामान्य रुग्णांचे आरोग्य धोक्यात आणणाऱ्या के.ई.एम रुग्णालयातील ब्लड बँकेच्या सर्व संबंधित दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) अंशत: खरे आहे.

अन्न व औषध प्रशासन तसेच केंद्रीय औषध मानक नियंत्रण संस्था यांनी दिनांक १७ नोव्हेंबर, २०२५ व दिनांक २५ नोव्हेंबर, २०२५ रोजी के.ई.एम. रुग्णालयातील रक्त केंद्राची संयुक्त तपासणी केली. सदर संयुक्त तपासणीत आढळलेल्या त्रुटींची पुर्तता करण्याबाबत सूचना प्राप्त झाल्या आहेत. तथापि, याबाबत कारणे दाखवा नोटीस देण्यात आलेली नाही.
(२) हे खरे नाही.

के.ई.एम. रुग्णालयातील रक्त केंद्रात केवळ रक्त देण्यास पात्र ठरलेल्या रक्तदात्यांच्या रक्तांची HIV निदानासाठीची चाचणी केली जाते. त्यामुळे नियमीत तपासणीसाठी येणाऱ्या गर्भवती महिलेच्या रक्ताची एच.आय.व्ही. (HIV) निदानासाठीची चाचणी रक्त केंद्रात करण्यात येत नाही.
(३) के.ई.एम. रुग्णालयातील रक्तसंक्रमण औषध विभागाने दिनांक ०५ जानेवारी, २०२६ रोजी त्यांचे अभिप्राय अन्न व औषध प्रशासन व केंद्रीय औषध मानक नियंत्रण संस्था यांना सादर केले आहेत.
(४) के.ई.एम. रुग्णालयातील रक्त केंद्रामध्ये अन्न व औषध प्रशासन आणि केंद्रिय औषध मानक नियंत्रण संस्था यांच्या सर्व नियमांचे पालन करूनच रक्त संकलन व वितरण करण्यात येते. रुग्णांना पूर्णत: सुरक्षित असलेले रक्त उपलब्ध करून दिले जाते.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नागपूर शहरातील तलावांच्या प्रदूषणात वाढ झाल्याबाबत

**(८) * ६६३० डॉ.परिणय फुके, श्री.प्रविण दरेकर, श्रीमती उमा खापरे, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ‘ग्रीन सिटी’ अशी ओळख असलेल्या नागपूर शहरातील अंबाझरी, फुटाळा आणि सोनेगाव यांसारख्या प्रमुख तलावांमध्ये जलपर्णीची वाढ झाल्यामुळे तलावांचे प्रदूषण वाढले असल्याचे माहे डिसेंबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राष्ट्रीय हरित न्यायाधिकरणाने (NGT) सदर गंभीर स्थितीची दखल घेऊन नागपूर महानगरपालिकेला तलावांच्या पुनरुज्जीवन आणि स्वच्छतेचा आराखडा सादर करण्याचे निर्देश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, केवळ सौंदर्यीकरणावर कोट्यवधी रुपये खर्च केल्यामुळे शासकीय निधीचा अपव्यय झाला असून तलावांच्या मूळ समस्यांकडे व प्रदूषणाकडे दुर्लक्ष झाल्यामुळे तलावांमधील ऑक्सिजनची पातळी कमी झाली आहे, तसेच परिसरातील वस्त्यांमधील सांडपाणी आणि औद्योगिक रसायने थेट तलावात सोडली जात असल्यामुळे प्रदूषणाबाबतच्या नियमांचे उल्लंघन रोखण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) असल्यास, शहरातील जलसंतुलन राखण्यासाठी सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पाची (STP) प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी शासनाने कोणती धोरणात्मक कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) नागपूर शहरातील अंबाझरी तलावातील जलपर्णीची वाढ झाल्याचे तसेच शहरातील प्रमुख तलावांत पाण्याची गुणवत्ता काही प्रमाणात कमी झाल्याचे आढळून आले आहे.
(२) हे खरे आहे.

मा.राष्ट्रीय हरित लवादाने (NGT) दिनांक ३ फेब्रुवारी, २०२६ रोजी झालेल्या सुनावणीत फुटाळा तलावाच्या स्वच्छतेचा आराखडा सादर करण्याचे निर्देश दिले आहेत.
(३) नागपूर महानगरपालिकेने तलावाचे सौंदर्यीकरण प्रकल्प (टप्पा-१) अंतर्गत पर्यावरणीय संवर्धनाच्यादृष्टीने तलावाचे पुनरुज्जीवन, खोलीकरण, Recharge Shaft, भिंतीची व हिरवळ विषयक कामे पूर्ण केली आहेत.

नागपूर महानगरपालिकेकडून जलपर्णी काढण्याचे काम सातत्याने करण्यात येत असून यावर कायमस्वरुपी उपाययोजना करण्याकरता निरी या संस्थेकडून तांत्रिक सहयोग घेण्यात येत आहे.

औद्योगिक सांडपाणी थेट तलावात सोडले जात नाही. तथापि, महाराष्ट्र औद्योगिक विकास मंडळाच्या क्षेत्रातील रहिवासी वस्त्यांमधून तलावात सोडल्या जाणाऱ्या सांडपाण्याबाबत प्रदूषणाच्या नियमांचे उल्लंघन केल्याबाबत कारवाई करण्यात येते. तलावांत कचरा टाकण्यास निर्बंध असून याचे उल्लंघन करणाऱ्यांविरुद्ध महानगरपालिकेच्या उपद्रव शोध पथकामार्फत दंडात्मक कार्यवाही करण्यात येते. तसेच फुटाळा तलावात सांडपाण्याचा निचरा होऊ नये याकरीता कश्मिरी बस्ती परिसरात मल जल वाहिनी टाकण्याचे काम करण्यात येत आहे.
(४) सद्य:स्थितीत नागपूर महानगरपालिकेचे एकूण ३६० द.ल.लि. प्रति दिन व नागपूर सुधार प्रन्यासचे एकूण ६३.५ द.ल.लि. प्रति दिन असे एकूण ४२३.५ द.ल.लि. प्रति दिन सांडपाण्याचे शुध्दीकरण करण्यात येते.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## जेजुरी (ता.पुरंदर, जि.पुणे) येथे भेसळयुक्त भंडाऱ्यामुळे दुर्घटना झाल्याबाबत

**(९) * ७०१३ श्री.योगेश टिळेकर, श्री.पंकज भुजबळ, श्री.अमोल मिटकरी, श्री.इद्रिस नायकवडी :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे जिल्ह्यातील जेजुरी (ता.पुरंदर) येथे भंडाऱ्याची उधळण करताना पेट घेतल्याने झालेल्या दुर्घटनेत १६ जण भाजले असल्याची बाब माहे डिसेंबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील प्रमुख शक्तिपीठे (उदा. तुळजापूर, कोल्हापूर, वणी) तसेच पंढरपूर व जेजुरी यांसारख्या मोठ्या धार्मिक स्थळांच्या परिसरात भाविकांना विकल्या जाणाऱ्या हळदी-कुंकू व भंडाऱ्यात घातक रासायनिक रंगांची भेसळ होत असून सदर भेसळयुक्त साहित्यामुळे भाविकांना त्वचेचे विकार व डोळयांच्या गंभीर समस्या उद्‌भवत असून, या संवेदनशील विषयाची गांभीर्याने दखल घेऊन शासनाने या धार्मिक स्थळी भेट देऊन किती विक्रेत्यांची तपासणी केली आहे,
(३) असल्यास, गेल्या वर्षभरात तुळजापूर व पंढरपूर सारख्या ठिकाणी केमिकल युक्त हळदी-कुंकू विक्री करणाऱ्यांवर कोणती कारवाई करण्यात आली आणि किती साठा जप्त करण्यात आला याचा तपशील काय आहे तसेच आगामी नाशिक सिंहस्थ कुंभमेळ्यातील कोट्यवधी भाविकांच्या आरोग्याचा विचार करता, अशा भेसळ रोखण्यासाठी शासनाने कोणती विशेष प्रतिबंधात्मक मोहीम राबवून भेसळ करणाऱ्या उत्पादकांवर अन्न सुरक्षा व मानके कायद्यानुसार (FSSAI) फौजदारी कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.नरहरी झिरवाळ :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) भाविकांना विक्री होणारे हळदी, कुंकू व भंडारा हे सेवनासाठी नसून श्रद्धेचा भाग म्हणून उधळण्यासाठी तसेच त्वचेवर लविण्यासाठी वापर होत असल्याने त्यांचा अन्नपदार्थात समावेश होत नाही. औषधे व सौदर्यं प्रसाधने कायदा, १९४० व त्याअंतर्गत नियम, १९४५ अन्वये औषध व सौंदर्य प्रसाधनाचे नियमन करण्यात येते. 'भंडारा' हा 'औषधे व सौंदर्य प्रसाधने' च्या व्याखेत मोडत नाही. तथापि, कपळावरती लावण्यात येणारे कुंकू हे सौंदर्य प्रसाधने असून प्रतिबंधात्मक कारवाई म्हणून सदर नमुने घेण्यात येतात.

अन्न व औषध प्रशासनाने दिनांक २२/१२/२०२५ रोजी औषधे व सौंदर्य प्रसाधने कायदा, १९४० व सौंदर्य प्रसाधने त्याअंतर्गत नियम, २०२० या कायद्यानुसार नंदि चौक, जेजुरी येथील मे. श्रृष्टी प्रसाद भंडार या दुकानाची पोलिसांसमवेत तपासणी/चौकशी केली असता सदर दुकानामध्ये विनालेबलच्या एकूण १५ बॅगेमध्ये प्रत्येकी ५ किलो याप्रमाणे पिवळा रंगाचा भंडारा निर्दशनास आला. सदर साठा पुढील कारवाईसाठी पोलीस ठाणे, जेजूरी येथे पोलिसांमार्फत नेण्यात आला. सदर बॅगेतून १ नमूना चाचणी साठी पोलिसांसमक्ष घेण्यात आला व उर्वरीत साठा संबधीत पोलीस ठाणे येथे जमा करण्यात आला असून सदर साठा संभाळून ठेवण्याबाबत संबधीत पोलीस ठाणे यांना कळविण्यात आले आहे. सदर साठ्यातील नमुना चाचणीकरीता औषध नियंत्रण प्रयोगशाळा, छत्रपती संभाजीनगर येथे पाठविण्यात आला होता. सदर नमुन्यांचा अहवाल दिनांक २०/०२/२०२६ रोजी प्राप्त झाला असून सदर अहवालानुसार भंडाऱ्यामध्ये ज्वालाग्रही पदार्थाची भेसळ जसे Phosphorus, Camphor असल्याचे आढळून आले नाही. तसेच, त्याव्यतिरिक्त शरीरास हानीकारक Heavy Metals, Lead, Arsenic, इत्यादी घटक नेमून दिलेल्या IS परिमानानुसार असल्याचे आढळून आले असून सदर नमुन्यात Metallic Yellow Color आढळून आले नाही.

या घटनेपूर्वी अन्न व औषध प्रशासनाने दिनांक २९/०३/२०२५ रोजी जेजुरी येथील भंडारा विक्रेत्याकडून भंडाऱ्याचा नमुना चाचणीसाठी घेण्यात आला होता. सदर नमुन्यांच्या प्राप्त विश्लेषण अहवालनुसार सदर नमुने परिमानानुसार असल्याचे आढळून आले होते. त्यामुळे अद्यापावेतो भंडाऱ्यामध्ये

घातक रसायन रंगाची भेसळ झाल्याचे निदर्शनास आलेले नाही. तसेच, भंडाऱ्यातील साहित्यामुळे भाविकांना त्वचेचे विकार व डोळयांच्या समस्या उद्‌भवत असल्याचे निदर्शनास आले नाही.

तसेच, अन्न व औषध प्रशासनाने दिनांक २२/१२/२०२५ रोजी अन्न सुरक्षा व मानके कायदा, २००६ नियम व नियमन, २०११ नुसार घटना घडलेल्या ठिकाणी तपासणी करून हळद पावडर वाहतूक करणारे वाहन क्र. एम एच ०७ ए जे ५८२९ टाटा इंट्रा व्ही ३० या कंपनीचे वाहनातून प्रत्येकी १० कि. वजनाच्या कंपनी packed, sealed & labelled असे २२० bags चा हळदीचा साठा आढळून आला. त्यानुसार, हळद या अन्नपदार्थाचा नमुना अन्न सुरक्षा मानके कायद्यानुसार विश्लेषण करण्याकरीता घेऊन उर्वरित साठा २२० बॅग (२१९८ किलो) किंमत रुपये २,६३,७६०/- लेबलदोष, कमी दर्जाचा व भेसळयुक्त असल्याच्या संशयावरून जप्त करून जेजुरी पोलीस स्टेशन येथे ठेवण्यात आला आहे. सदर अन्न नमुन्याचा एक नमुना भाग राज्य आरोग्य प्रयोगशाळा, पुणे येथे विश्लेषणासाठी पाठविण्यात आला आहे. त्याचा अहवाल प्राप्त झाला असून त्यामध्ये Turmeric Structure and unidentified Foreign Starch व Pesticide Residue ०.१९० mg/kg आढळून आल्यामुळे सदरचा अहवाल अन्न विश्लेषक यांनी त्यांच्या दिनांक ३१/१२/२०२५ रोजीच्या अहवालानुसार असुरक्षित घोषित केला आहे. सदर अहवालाच्या अनुषंगाने अन्न सुरक्षा व मानके कायद्यानुसार पुढील कारवाई करण्यात येत आहे.

पंढरपूर व कोल्हापूर देवस्थान परिसरात विक्री होणारे हळदी-कुंकू हे मुख्यत्वे टिळा लावण्यासाठी वापरले जात असून त्याचा वापर अन्नपदार्थ म्हणून केला जात नाही. तसेच, देवस्थानाच्या परिसरात प्रशासनाकडुन वेळोवेळी आस्थापनाच्या तपासण्या करण्यात येतात.

औषधे व सौंदर्य प्रसाधने कायदा, १९४० व त्याअंतर्गत नियम, १९४५ व सौंदर्य प्रसाधने त्याअंतर्गत नियम, २०२० नुसार औषधे व सौंदर्य प्रसाधनांचे नियमन करण्यात येते. कपाळावरती लावण्यात येणारे कुंकू हे सौंदर्य प्रसाधने असून प्रतिबंधक कार्यवाही म्हणून सदर नमुने घेण्यात येतात. त्याच धर्तीवर आगामी नाशिक सिंहस्थ कुंभमेळयातील कोट्यवधी भाविकांच्या आरोग्याचा विचार करता प्रतिबंधात्मक कार्यवाही करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुलुंड डम्पिंग ग्राऊंडवर गोल्फ क्लब उभारण्याच्या निर्णयास स्थानिकांचा विरोध असल्याबाबत

**(१०) * ६५७९ श्री.मिलिंद नार्वेकर :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहरासह उपनगरांतील कचरा टाकण्यात येत असलेल्या ६० एकर परिसराचे मुलुंड डम्पिंग ग्राऊंड येथील प्रक्रिया सन २०२६ मध्ये बंद होणार असल्यामुळे गत अनेक वर्षांपासून दुर्गंधीचा त्रास सहन करित असलेल्या रहिवाशांना दिलासा मिळणार असल्याची बाब दिनांक २२ डिसेंबर, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर डम्पिंग ग्राऊंड बंद झाल्यावर या ठिकाणी गोल्फ क्लब उभारण्याच्या बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या प्रस्तावास स्थानिक नागरिकांनी विरोध केला असून, या ठिकाणी बृहन्मुंबई महानगरपालिकेने मुंबई उपनगरातील रुग्णांसाठी सुसज्ज रुग्णालय उभारावे अशी मागणी तेथील स्थानिक लोकप्रतिनिधी व स्थानिक नागरिकांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त मागणीनुसार सदर ठिकाणी गोल्फ क्लब ऐवजी बृहन्मुंबई महानगरपालिकेचे सुसज्ज रुग्णालय उभारण्याबाबतच्या प्रस्तावाबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे.
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) मुलुंड क्षेपणभुमी येथील कचऱ्यावर शास्त्रोक्त पद्धतीने प्रक्रिया करुन सदर जागा पुन:प्राप्त करुन घेण्याची कार्यवाही महानगरपालिकेद्वारे नियुक्त मे.बायो मायनिंग प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीद्वारे करण्यात येत आहे.
(२) व (३) हे खरे आहे.

सदर जागेवरील कचऱ्यावर शास्त्रोक्त प्रक्रिया करून जमीन पुन:प्राप्त करण्याचे काम ७८.६३% पूर्ण झाले आहे. सदर जागा मोकळी झाल्यानंतर या जागेच्या वापराबाबत अनेक नागरिकांकडून बृहन्मुंबई महानगरपालिकेस विनंती अर्ज प्राप्त झाले आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मार्तंडी (ता.गंगापूर, जि.छत्रपती संभाजीनगर) नदीवरील पुलाचे काम अपूर्णावस्थेत असल्याबाबत

**(११) * ६७४४ श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) लासुर स्टेशन परिसरातील मौजे वजनापूर (ता.गंगापूर, जि.छत्रपती संभाजीनगर) येथील मार्तंडी नदीवरील छत्रपती संभाजीनगर जिल्हा-प्रमुख मार्ग-१०४ रस्त्यावरील तीन वर्षांपूर्वी मंजूर असलेल्या पुलाच्या बांधकामास सुरुवात झाली, परंतु पुलाचे काम दोन वर्षांपासून अपूर्णावस्थेत असल्याची बाब माहे डिसेंबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर पुलाच्या बांधकामाकरीता रुपये २ कोटी एवढी रक्कम खर्च करुनही पूल अद्याप वाहतुकीसाठी तयार झाला नसल्याने परिसरातील शेतकरी, ग्रामस्थ व विद्यार्थ्यांना प्रवास करताना अनेक समस्यांचा सामना करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर पुलाचे काम तात्काळ पूर्ण करण्यासाठी परिसरातील शेतकरी व ग्रामस्थांनी वेळोवेळी पाठपुरावा केला परंतु संबंधित अधिकारी सदर प्रकरणी दुर्लक्ष करुन कोणतीच दखल घेत नसल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर पुलाचे बांधकाम तात्काळ पूर्ण करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे, तसेच सदर प्रकरणी दुर्लक्ष करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

सदर पुलाचे बांधकाम पूर्ण झाले असून, स्थानिक शेतकरी यांनी कामात अडथळा निर्माण केल्याने पुलाच्या रेलींगचे काम बाकी आहे. सद्य:स्थितीत सदर पुलावरुन वाहतूक सुरु आहे.

(३) हे खरे नाही.
(४) सदर पुलाच्या कामात अडथळा निर्माण केलेल्या संबंधितांवर उचित कारवाई करुन पुलाचे उर्वरित काम करण्याचे नियोजन आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## शिवाजीनगर (जि.छत्रपती संभाजीनगर) येथील भुयारी मार्गाची दुरुस्ती करण्याबाबत

**(१२) * ७४१६ श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.अमोल मिटकरी :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शिवाजीनगर (जि.छत्रपती संभाजीनगर) येथे रुपये २६ कोटी एवढ्या रकमेचा भुयारी मार्ग चुकीच्या पद्धतीने बांधल्यामुळे पावसाळ्यात नागरिकांना वाहतुकीस अडथळा निर्माण होत असल्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी व सामाजिक कार्यकर्ते यांनी महानगरपालिका आयुक्त, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी व रेल्वे प्रशासनाकडे माहे ऑक्टोबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान लेखी तक्रारी केल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर भुयारी मार्ग चुकीचा बांधल्यामुळे त्या भुयारी मार्गात पावसाळ्यात मोठ्या प्रमाणात पाणी साचत असून, भुयारी मार्गाला गळती लागल्यामुळे नागरिकांना प्रवास करता येत नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, क्रांती चौक येथे बांधण्यात आलेल्या पुलाचे काम निकृष्ट दर्जाचे असून पुलाच्या खांबानाही तडे गेले असून सदर कामाची दुरुस्ती करण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी महानगरपालिका आयुक्त यांच्याकडे केली असून त्यानुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) असल्यास, शासनाने सदर प्रकरणी दखल घेऊन छत्रपती संभाजीनगर येथील भुयारी मार्गाचे काम चुकीच्या पद्धतीने करणाऱ्या संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली तसेच सदर भुयारी मार्गाच्या दुरुस्तीचे काम करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले :** (१) होय, निवेदन प्राप्त आहे.
(२) हे अंशत: खरे आहे.
(३) हे खरे नाही.
सदर उड्डाणपुलाची वार्षिक तपासणी होऊन योग्य ती देखभाल दुरुस्ती करण्यात येते. सद्य:स्थितीत सदर पूल वाहतुकीस सुरक्षित असून पुलाच्या खांबांना कोणतेही तडे गेल्याचे आढळून येत नाहीत.
(४) सदर भुयारी मार्गाचे बांधकाम रेल्वे विभाग व सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्या सामायिकरित्या मंजूर आराखड्यानुसार करण्यात आलेले आहे. माहे मे, २०२५ मध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे कलेक्शन चेंबरमध्ये गाळ गेल्याने पाईपलाईन चोक-अप झाली होती. परंतु, सदरील गाळ काढून पाण्याचा निचरा करुन वाहतूक सुरळीत करण्यात आली. तसेच, अशी परिस्थिती पुन्हा येऊ नये म्हणून संयुक्त पाहणी करुन योग्य त्या उपाययोजना करण्यात आल्या आहेत.

भुयारी मार्गाच्या बाजूने जाणाऱ्या भूमीगत पाईपलाईनचे काम सद्य:स्थितीत प्रगतीत आहे. सदर काम पूर्ण झाल्यावर भुयारीमार्गालगतच्या सेवा रस्ते व स्टॉर्म वॉटर गटारचे काम पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## हदगाव (जि.नांदेड) शहरासाठीचा पाणीपुरवठा प्रकल्प अपूर्णावस्थेत असल्याबाबत

**(१३) * ६७५५ श्री.हेमंत पाटील, श्री.कृपाल तुमाने :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हदगाव (जि.नांदेड) शहराला शुद्ध पाणीपुरवठा करण्यासाठीच्या प्रकल्पाला सन २०१४ मध्ये मंजूरी देऊन रुपये ५२ कोटी एवढ्या रकमेचा निधी उपलब्ध करुन देण्यात आला असून, ९ वर्षांचा कालावधी होवून गेला तरीही अद्याप प्रकल्पाचे काम अपूर्णावस्थेत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकल्पाचे काम एवढ्या संथ गतीने होण्याची कारणे काय आहेत, तसेच सदर प्रकल्पात नवीन पाईपलाईन टाकणे, जलशुद्धीकरण प्रकल्प उभारणे यांसारख्या कामांचा समावेश आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, हदगाव शहरातील नागरिकांना शुद्ध आणि पुरेसे पाणी मिळण्यास मदत होणार असल्याने, उक्त प्रकल्पाचे काम तातडीने पूर्ण करुन शुद्ध पाणीपुरवठा होण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१), (२), (३) व (४) महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियानांतर्गत हदगाव शहराच्या रुपये ४६.७७ कोटी किंमतीच्या पाणीपुरवठा प्रकल्पास दिनांक २२ एप्रिल, २०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्यात आली असून सदर प्रकल्पाची नगरपरिषद मार्फत निविदा प्रक्रिया राबवून दिनांक ०४ जुलै, २०२२ रोजी कार्यादेश देण्यात आलेले आहेत.

प्रस्तुत प्रकल्पाच्या कामात जलशुद्धीकरण केंद्राची उभारणी, नवीन वितरण व्यवस्थेच्या कामाचा समावेश असून प्रकल्पाच्या कामातील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या हद्दीतील रस्त्यामधून पाईप लाईन टाकणे, जॅकवेलकडे जाणारा अप्रोच ब्रिज व रस्ता स्थानिक शेतकरी यांनी अडविल्यामुळे प्रकल्पाचे काम करण्यास विलंब होत असून सदरील प्रश्नावर तोडगा काढण्यासाठी स्थानिक शेतकऱ्यांसोबत नगरपरिषद मार्फत चर्चा सुरू आहे.

सद्य:स्थितीस प्रकल्पाची ८०% भौतिक प्रगती झाली असून प्रस्तुत प्रश्न मार्गी लागताच तीन ते चार महिन्यात प्रकल्पाचे काम पूर्ण करण्याचे नगरपरिषदेचे नियोजन आहे.

-----------------

## दिंडोशी (मुंबई) भागातील म्हाडा वसाहतीतील इमारतीचा पुनर्विकास प्रलंबित असल्याबाबत

**(१४) * ७६५२ श्रीमती चित्रा वाघ, श्री.प्रसाद लाड, श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील दिंडोशी भागातील म्हाडा वसाहतीतील सुमारे ४४ इमारतींची दुरवस्था झाली असून सदर इमारतींमध्ये राहणाऱ्या रहिवाशांच्या जीवितास धोका निर्माण झाला असल्याची बाब माहे डिसेंबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर इमारतींचा पुनर्विकास किंवा तातडीच्या दुरुस्ती करण्याबाबत वारंवार मागणी होऊनही म्हाडा प्रशासनाकडून अद्याप कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने म्हाडा प्रशासनास सदर तक्रारींची दखल घेण्याचे निदेश देऊन रहिवाशांच्या सुरक्षिततेच्यादृष्टीने सदर इमारतींचे, मालमत्तेचे नुकसान, जीवितहानी होऊ नये, नागरिकांना मूलभूत सोयी-सुविधा उपलब्ध व्हाव्यात तसेच इमारतींच्या पुनर्विकास व इमारतींची दुरवस्था दूर करण्याकरीता तातडीने आवश्यक निधी उपलब्ध करुन देण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१), (२) व (३) शिवशाही पुनर्वसन प्रकल्प मर्यादित यांच्यामार्फत दिंडोशी, मालाड (पुर्व) येथे सन २००१ मध्ये २,६१४ सदनिका असलेल्या ३३ इमारती बांधण्यात आल्या होत्या. सदर इमारतीतील सदनिकांचे वितरण सन २००२ मध्ये करण्यात आले आहे. सदर सदनिकांच्या देखभाल शुल्कापोटी शिवशाही पुनर्वसन प्राधिकरणाने प्रति सदनिका रुपये २००० याप्रमाणे रक्कम झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे जमा केली होती. सदर गृहनिर्माण संस्थांनी इमारतीस १० वर्षे पूर्ण झाल्यानंतर झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे जमा असलेली रक्कम त्यांच्या गृहनिर्माण संस्थांकडे वर्ग केली आहे. सदर सर्व इमारतींची सहकारी गृहनिर्माण संस्था नोंदणीकृत असून या सर्व इमारतींचा महासंघही नोंदणीकृत आहे. त्यामुळे सदर इमारतींची आवश्यक देखभाल व दुरुस्ती संबंधित संस्था/महासंघ यांनी करणे आवश्यक आहे. तसेच पुनर्विकासासाठी संबंधित संस्थेने संमतीपत्र व विकासनियुक्ती पत्र सादर करणे आवश्यक आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बृहन्मुंबई महानगरपालिकेने शहरातील सहा रुग्णालयांचा सार्वजनिक-भागीदारी तत्वावर विकास करण्याचा निर्णयाबाबत

**(१५) * ७६२१ श्री.शशिकांत शिंदे, ॲड.अनिल परब :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बृहन्मुंबई महानगरपालिकेने शहरातील सहा मोठ्या रुग्णालयांचा सार्वजनिक-भागीदारी तत्वावर विकास करण्याचा निर्णय घेतला असून, सदर निर्णयामुळे मोफत रुग्णसेवांवरही सशुल्क आकारले जाणार असल्याने रक्त तपासणी, क्ष-किरण, सीटीस्कॅन, एमआरआय याकरीता अवाजवी शुल्क आकारले जाण्याची शक्यता निर्माण झाली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महानगरपालिकेने यापूर्वी २० हून अधिक प्रकल्प पीपीपी तत्वावर सुरु केले असून त्यात अतिदक्षता विभाग, निदान केंद्रे, डायलिसिस आणि प्रसुतीगृहे आदींचा समावेश असून सदर निर्णयाचा परिणाम गरीब व वंचित घटकातील नागरिकांवर होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, खाजगी रुग्णालयांच्या महागड्या उपचारांपासून दिलासा देणारी बृहन्मुंबई महानगरपालिकेची रुग्णालये आता पीपीपी निर्णयामुळे सर्वसामान्यांसाठी महाग होण्याची शक्यता निर्माण झाली असून मुंबईतील सुमारे ४० टक्के लोक झोपडपट्टीमध्ये वास्तव्य करित असून संक्रमण शिबिरे, प्रकल्पबाधितांच्या वसाहतींमध्ये लाखो लोक वास्तव्यास आहेत, यामधील बहुतांश लोक मोफत उपचारासाठी महानगरपालिका रुग्णालयांवर अवलंबून असून, उक्त रुग्णालये सशुल्क झाल्यास गरीबांना आर्थिक अडचणीचा सामना करावा लागेल, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, महानगरपालिका रुग्णालयांचे खाजगीकरण झाल्यास यावर प्रशासनाचे नियंत्रण राहणार नाही त्यामुळे सदर निर्णयाचा फेरविचार करण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली, तसेच गरीब जनतेच्या आरोग्याचा विचार करून प्रशासनाने तज्ज्ञांची समिती नेमून आरोग्य व्यवस्था सुधारण्यासाठी ठोस धोरण तयार करुन प्रभावी अंमलबजावणी करण्याकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.

बृहन्मुंबई महानगरपालिकेचे भगवती रुग्णालय आणि गोवंडी लल्लुभाई कंपाउंड येथील रुग्णालय या दोन आरोग्य संस्था सार्वजनिक खाजगी भागीदारी प्रकल्पांतर्गत भाडेतत्वावर चालविण्याकरीता निविदा प्रक्रिया राबविण्यात आलेली होती. त्यांपैकी भगवती रुग्णालयाची निविदा प्रक्रिया रद्द करण्यात आलेली असून लल्लुभाई कंपाउंड रुग्णालयाकरीता फेरनिविदा मागविण्यात आलेली आहे.

महानगरपालिकेच्या आरोग्यविषयक सेवा-सुविधा पुरविण्याच्या सार्वजनिक खाजगी सहभाग प्रकल्पांतील रुग्णालयांत रुग्णांना आयुष्यमान भारत-प्रधानमंत्री जनआरोग्य योजना/महात्मा ज्योतीराव फुले जनआरोग्य योजनेंतर्गत कॅशलेस उपचार उपलब्ध होणार आहेत.

सि.टी. स्कॅन, एम.आर.आय., क्ष-किरण, युएसजी, कलर डॉप्लर ह्या चाचण्यांचे दर महानगरपालिकेद्वारे निश्चित करण्यात येणार आहेत. ज्या रुग्णांचा समावेश कोणत्याही योजनेमध्ये होऊ शकत नाही अशा रुग्णांवरील उपचारांच्या खर्चाची प्रतिपूर्ती महानगरपालिकेने निश्चित केलेल्या दरांनुसार महानगरपालिकेकडून करण्यात येणार आहे.
(२) हे खरे नाही.

महानगरपालिकेद्वारे सार्वजनिक खाजगी सहभाग तत्वावर सन २०१३ पासून डायलिसिस केंद्र, सन २०१८ पासून अतिदक्षता विभाग व निदान केंद्रे आणि सन २०२३ पासून बालकांचे अतिदक्षता विभाग सुरु करण्यात आले आहेत. तथापि, प्रसुतीगृहे सार्वजनिक खाजगी सहभाग तत्वावर देण्यात आलेले नाहीत.
(३) महानगरपालिकेच्या सार्वजनिक खाजगी भागीदारी प्रकल्पांतर्गत उपलब्ध होणाऱ्या आरोग्यविषयक सेवा-सुविधा महानगरपालिकेने निश्चित केलेल्या दरांनुसार असणार आहेत. रुग्णांना प्रधानमंत्री जनआरोग्य योजना / महात्मा ज्योतीराव फुले जन आरोग्य योजना, सी.जी.एच.एस., ई.एस.सी.आय., टीपीए अंतर्गत कॅशलेस उपचार प्राप्त होणार असल्याने नागरिकांना आर्थिक - अडचणी उद्भवणार नाहीत.

ह्या धोरणांतर्गत नागरिकांना त्यांच्या राहत्या ठिकाणाजवळ उत्तम दर्जाच्या विशेष व अतिविशेष विभागांच्या उपचार सुविधा उपलब्ध होऊन त्यायोगे महानगरपालिकेच्या प्रमुख रुग्णालयांवरील रुग्णभार कमी होण्यास सहाय्य होणार आहे.

(४) महानगरपालिकेच्या सार्वजनिक खाजगी सहभाग प्रकल्पांतर्गत चालविण्यात येणाऱ्या रुग्णालयांमध्ये महानगरपालिकेचे विशेष कार्यकारी अधिकारी नियुक्त करण्यात येणार असून त्यांच्यामार्फत रुग्णांना आवश्यक ते उपचार ठरवून दिलेल्या दरांनुसार होत आहेत याची दक्षता घेतली जात आहे. रुग्णांना भेडसावणारे प्रश्न, तक्रारी व त्यांचे निराकरण, या विशेष कार्य अधिकाऱ्यांमार्फत करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## गुहागर-विजापूर राष्ट्रीय महामार्गावरील (ता.कराड, जि.सातारा) कृष्णा पुलाच्या दोन्ही बाजुला संरक्षक जाळ्या बसविण्याबाबत

**(१६) * ७६७१ श्री.सदाशिव खोत, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्रीमती उमा खापरे, डॉ.परिणय फुके, श्री.अमित गोरखे, श्रीमती चित्रा वाघ, अ‍ॅड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गुहागर-विजापूर राष्ट्रीय महामार्गावरील कराड (जि.सातारा) शहरानजीक असलेल्या कृष्णा पुलावरून विद्यानगर परिसरातील विविध शैक्षणिक संकुलामुळे दैनंदिन अनेक विद्यार्थी-विद्यार्थीनी तेथील पादचारी पुलावरून ये-जा करत असून पुलाच्या दोन्ही बाजूला असलेल्या संरक्षक कठड्याची उंची अत्यंत कमी असून अनेक सामाजिक संघटनांनी पुलाच्या दोन्ही बाजुला संरक्षक जाळी बसविण्याची वारंवार मागणी करुनही याबाबत प्रशासन दुर्लक्ष करित असल्याची बाब माहे डिसेंबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर कृष्णा पुलावरून नदीत उडी घेत आजवर अनेक महिला व मुलींनी आत्महत्या केल्याने कृष्णा पुलाची ओळख सुसाईड पॉईंट झाली असून नवीन वर्षाच्या पहिल्याच दिवशी एका युवतीने पुलावरून उडी मारत आत्महत्या केली असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, कृष्णा पुलावरून ये-जा करणारे नागरिक, शालेय तसेच महाविद्यालयीन विद्यार्थी-विद्यार्थीनी यांच्या सुरक्षिततेच्यादृष्टीने तसेच सदर पुलावरून होणाऱ्या आत्महत्या रोखण्याकरीता पुलाच्या दोन्ही बाजुला संरक्षक जाळ्या बसविण्यासाठी अंदाजे रुपये ४३ लाख एवढ्या रकमेचे अंदाजपत्रक मंजूर असताना देखील संरक्षक जाळी बसविली जात नसून याकडे दुर्लक्ष करणाऱ्या संबंधितांवर शासनाने कारवाई करुन सदर काम तातडीने सुरु करण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले :** (१) हे खरे नाही.

गुहागर-चिपळूण-कराड-विटा हा महामार्ग राष्ट्रीय महामार्ग क्र. १६६ ई असा वर्गीकृत असून त्यापैकी कराड ते विटा ही प्रश्नांकित लांबी सा.बां. विभागाच्या राष्ट्रीय महामार्ग विभागाच्या अखत्यारीत आहे.

सामाजिक संघटनांनी केलेल्या मागणीस अनुसरून कृष्णा नदीवरील पुलास संरक्षक जाळी बसविण्याच्या कामास रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्रालय, मुंबई या कार्यालयाकडून दिनांक १६ जानेवारी, २०२६ रोजी रुपये ४०.७९ लक्ष किमतीस मंजुरी प्राप्त झालेली आहे.

(२) होय, हे खरे आहे.

सामाजिक संघटनांच्या निवेदनामधून सदर बाब निदर्शनास आली आहे.

(३) व (४) प्रस्तुत संरक्षक जाळीच्या कामास रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्रालयाकडून मंजुरी प्राप्त झाल्यानंतर सदर कामाची निविदा प्रक्रिया राबवून दिनांक १८ फेब्रुवारी, २०२६ रोजी कार्यारंभ आदेश देण्यात आला असून कामाची मुदत चार महिने आहे.

-----------------

## राज्यात बनावट क्रीडा प्रमाणपत्राच्या आधारे अनेक उमेदवारांनी शासकीय नोकऱ्या मिळविल्याबाबत

**(१७) * ६८६८ श्री.अमोल मिटकरी, श्री.विक्रम काळे, श्री.शिवाजीराव गर्जे, श्री.इद्रिस नायकवडी, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती येथे माहे सप्टेंबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान आयोजित केलेल्या क्रीडा विषयक कार्यक्रमात मा.क्रीडा मंत्री यांनी राज्यात बनावट क्रीडा प्रमाणपत्राच्या आधारे शासकीय नोकऱ्या मिळविल्याच्या प्राप्त झालेल्या तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी करण्याबाबत विभागास आदेशित केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बनावट क्रीडा प्रमाणपत्राच्या माध्यमातून नोकऱ्या मिळविल्यामुळे प्रत्यक्षात राज्यात राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर गौरव मिळवून देणाऱ्या खेळाडूंवर अन्याय झाला असून सदर प्रकरणी प्राप्त झालेल्या तक्रारींची दखल घेतली न जाण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, बनावट क्रीडा प्रमाणपत्र आढळून आलेल्या क्रीडा संघटनांवर व संबंधित दोषींवर कारवाई करुन बोगस स्पर्धा घेणे व प्रमाणपत्र विकण्याच्या प्रकार रोखण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती सुनेत्रा पवार :** (१) हे खरे नाही.

तथापि, अमरावती येथे झालेल्या क्रीडा व युवक संवाद कार्यक्रमात अनेक क्रीडा संघटनांकडून बनावट क्रीडा प्रमाणपत्र दिली जात असल्याबाबत तक्रारी उपस्थित केल्या होत्या.

(२) व (३) शासनाने विविध शासकीय, निमशासकीय व इतर क्षेत्रात अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडूंना ५ % आरक्षण देण्याबाबत शासनाने दिनांक ०१/०७/२०१६ रोजीच्या शासन निर्णयान्वये सुधारित धोरण निश्चित केले आहे.

सदर धोरणातंर्गत बनावट क्रीडा प्रमाणपत्राच्या माध्यमातून शासकीय नोकऱ्या मिळविल्या असल्याबाबत विभागास अनेक तक्रारी प्राप्त झालेल्या होत्या. त्याअनुषंगाने “बोगस क्रीडा प्रमाणपत्र, बोगस क्रीडा प्रमाणपत्र पडताळणी अहवाल समर्पण योजना” राबविण्यास दिनांक २३/०२/२०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये मंजूरी देण्यात आली आहे. त्याअतंर्गत १७० उमेदवारांनी बोगस क्रीडा प्रमाणपत्र समर्पित केली आहेत.

त्याचप्रमाणे बनावट प्रमाणपत्राच्या आधारे अनेक उमेदवारांनी शासकीय नोकरी मिळविल्याचे निदर्शनास आल्यामुळे बोगस क्रीडा प्रमाणपत्र धारकांवर नियंत्रण आणण्यासाठी दिनांक ३० जून, २०२२ च्या शासन निर्णयान्वये क्रीडा प्रमाणपत्र वैधता करण्याच्या कार्यपद्धतीमध्ये बदल करण्यात आला आहे. तसेच १२१ खेळाडू उमेदवार बनावट प्रमाणपत्रांच्या आधारे शासकीय सेवेत समाविष्ट झाले असल्याचे निदर्शनास आल्यानंतर, अशा खेळाडूंची नांवे प्रसिद्ध करुन खेळाडू ज्या विभागात नोकरीस आहेत त्या-त्या विभागांना कारवाई करण्याबाबत सूचित करण्यात आले आहे. त्यानुसार संबंधित विभागाने कारवाई करुन त्यांना नोकरीतून कमी केले आहे.

शासनाने शासन निर्णय दिनांक ०८/०१/२०२६ अन्वये क्रीडा प्रमाणपत्र प्रक्रीयेतील मानवी हस्तक्षेप कमी करण्यासाठी, बनावट क्रीडा प्रमाणपत्रांना आळा घालण्यासाठी आणि पडताळणी प्रक्रीयेतील विलंब टाळण्यासाठी, अद्ययावत तंत्रज्ञानाचा वापर करुन ब्लॉकचेन आधारित ‘‘क्रीडा-ई-प्रमाण’’ प्रणालीचा वापर करण्यास मान्यता दिली आहे. सदर प्रणाली ५ टक्के खेळाडू आरक्षणास पात्र ठरणाऱ्या महाराष्ट्र राज्यातील सर्व खेळाडू, संबंधित क्रीडा संघटना व सर्व संबंधितांवर बंधनकारक करण्यात आलेली आहे.
(४) विलंब झालेला नाही.

-----------------

## वरळी, मुंबई येथील हॉर्मस हाऊस पुनर्विकास प्रकल्पाबाबत

**(१८) * ७५१२ श्री.सचिन अहिर :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वरळी, मुंबई येथील हॉर्मस हाऊस पुनर्विकास प्रकल्पात (जी/दक्षिण प्रभाग) झालेल्या डीसीपीआर २०३४ नियमिन ३३ (१२)(ए) आणि (बी) अंतर्गत राबविण्यात येत असून दिनांक २० जून, २०२५ रोजीच्या सुधारित अहवालानुसार लाइसेंसिंग सर्व्हेअर (एलएस) मेसर्स तलाटी ॲण्ड पार्टनर्स एलएलपी यांनी बृहन्मुंबई महानगरपालिकेला सादर केलेल्या फाइल क्र.ई/बी ४३९५/जीएस/ए ला (सब अभियंता (बी.पी.) सिटी-एक्स आणि सह. अभियंता (बीपी) सिटी-VI मान्यता देण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या अहवालात पीएपी दाव्यांची टप्प्याटप्प्याने वाढ करुन १७ पीएपी वरुन ७६ पीएपी करण्यात आली असून नियमन ३३ (१२)(ए) व (बी) तसेच नियमन ३१(३) अंतर्गत मिळणाऱ्या प्रोत्साहनात्मक आणि फंजीबल एफएसआय लाभांचा समावेश आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, ७६ पीएपीला अंतिम एनओसीला नियमबाह्य मान्यता देण्यात आली असून सदर प्रकरणात झालेल्या अनियमिततेस जबाबदार असणाऱ्या संबंधितांवर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे अंशत: खरे आहे.

वास्तूविशारद यांनी बृहन्मुंबई विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली (२०३४) मधील विनियम ३० तसेच विनियम ३३(१२)(ए) व (बी) नुसार ७६ PAP साठी पुनर्वसन व विक्रीकरीता मिळणारा अतिरिक्त प्रोत्साहनात्मक चटई क्षेत्र निदेशांक आणि विनियम ३१(३) नुसार फंजिबल चटई क्षेत्र निदेशांक

यांचा दावा करून सुधारित आराखडे सादर केले. त्यानुषंगाने मा.आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांची प्रस्तावास आवश्यक सवलतींसाठी मंजूरी प्राप्त केल्यानंतर आराखडे दिनांक २२/०७/२०२५ रोजी मंजूर केले आहेत.
(२) हे खरे आहे.
(३) व (४) वरळी, मुंबई येथील हॉर्मस हाऊस पुनर्विकास प्रकल्पामध्ये (जी/दक्षिण प्रभाग) बृहन्मुंबई विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली (२०३४) मधील विनियम ३३(१२)(ए) व (बी) अंतर्गत एकूण ७६ नाहरकत प्रमाणपत्र देण्यात आले असून बाधित झोपडीधारकांच्या इच्छेनुसार त्यांचे संमतीपत्र व पात्रतेचे पुरावे विकासकामार्फत सादर केल्यानंतर पुराव्यांची छाननी करुन झोपडीधारकांची पात्रता निश्चित करण्यात आली आहे. सक्षम प्राधिकारी यांच्या मंजुरीने प्राथमिक नाहरकत प्रमाणपत्र देण्यात येते व तद्नंतर झोपडीधारक व विकासक यांच्यामध्ये नोंदणीकृत कायमस्वरुपी पर्यायी निवास करारपत्राच्या दस्ताऐवज व झोपडीचे निष्कासन झाल्याची खात्री करण्यात येऊन प्रकल्पामध्ये झोपडीधारकास कायमस्वरुपी सदनिका मिळण्यासापेक्ष अंतिम नाहरकत प्रमाणपत्र विकासकास देण्यात येते. तथापि, अंतिम नाहरकत प्रमाणपत्र देताना कोणतीही नियमबाह्यता झालेली नसून नाहरकत प्रमाणपत्राची एक प्रत इमारत व प्रस्ताव विभागास पुढील कार्यवाहीकरीता पाठविण्यात येते. उपरोक्त बांधकाम हे प्रगतीपथावर असल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

-----------------

## घोडबंदर (जि.ठाणे) येथील मुख्य रस्ता व सेवा रस्ता यांच्या जोडणी प्रकल्पाचा फेरविचार करण्याबाबत

**(१९)** * **६९२६ ॲड.अनिल परब :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) घोडबंदर (जि.ठाणे) येथील सेवा रस्त्याचे मुख्य रस्त्याशी जोडणीचा प्रकल्प मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने हाती घेतला असून सदर प्रकल्पामुळे अस्तित्वात असलेला सेवा रस्ता कायमस्वरुपी नाहीसा होणार असून सेवा रस्त्यालगतची गृहसंकुले, विविध आस्थापना कार्यालये मुख्य मार्गालगत येणार आहेत, हे ही खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकल्पामुळे वाहतूक कोंडीची समस्या निर्माण होण्याची तसेच अपघात होण्याची शक्यता असून स्थानिक नागरिकांकडून विरोध करुन निदर्शने केली जात आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, घोडबंदर येथील सेवा आणि मुख्य रस्ते जोडणीचा फेरविचार करण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत घोडबंदर येथील मुख्य रस्त्याचे सेवा रस्त्याशी विलीनीकरण करण्याचा प्रकल्प मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने हाती घेतला आहे. तसेच ठाणे शहराच्या मंजूर विकास आराखड्यामध्ये घोडबंदर रस्ता ६० मी रुंदीचा विकास आराखडा रस्ता दर्शविण्यात आलेला आहे. यामध्ये स्वंतत्र सेवा रस्ते दर्शविण्यात आलेले नाही.

घोडबंदर रस्त्याची पूर्वी अस्तित्वात असलेली रुंदी ३६मी इतकी होती. यामध्ये दोन्ही बाजूस ९ मी रुंदीचे सेवा रस्ते आणि मुख्य रस्ता व सेवा रस्ता यामध्ये दोन्ही बाजूस ३ मी रुंदीचे पादचारी पथ होते. त्यामुळे या ठिकाणी मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होत होती. यामुळे प्राधिकरणाद्वारे दोन्ही बाजूला असलेले ९ मी रुंदीचे सेवा रस्ते मुख्य रस्त्यामध्ये विलीनीकरण झाल्यानंतर मुख्य रस्त्याची रुंदी ३६ मी वरुन ५४ मी इतकी होईल.

तसेच रस्त्याच्या दोन्ही बाजूला ३मी रुंदीचे पादचारीपथ बांधण्यात येणार असल्याने घोडबंदर रस्त्यावरील गृहसंकुले, विविध आस्थापना कार्यालये हे थेट मुख्य रस्त्यालगत येणार नाहीत.

(२), (३) व (४) हे खरे नाही.

सदर प्रकल्पामुळे वाहतूक कोंडीची समस्या होण्याची शक्यता नाही.

विलिनीकरणानंतर संपूर्ण रुंदीचा कॉंक्रिट रस्ता उपलब्ध होणार असून, मुख्य रस्त्याच्या दोन्ही बाजूंना प्रत्येकी ७ मार्गिका उपलब्ध होणार असल्याने घोडबंदर रस्त्याच्या कापुरबावडी ते गायमुख या भागातील वाहतूक कोंडी संपुष्टात येण्यास मदत होईल.

-----------------

## आर्वी (जि.वर्धा) नगरपरिषदेच्या पाणीपुरवठा योजना, जलशुद्धीकरण केंद्र व मलनिःस्सारण प्रकल्पाची कामे अपूर्णावस्थेत असल्याबाबत

**(२०) * ७७१९ श्री.दादाराव केचे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आर्वी (जि.वर्धा) नगरपरिषदमध्ये महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान अभियान अंतर्गत वाढीव पाणीपुरवठा योजना, जलशुद्धीकरण केंद्र, मलनि:स्सारण योजनेची कामे कार्यारंभ आदेशातील काम पूर्ण करण्याचा कालावधी संपल्यावरही अपूर्ण असल्याची बाब माहे डिसेंबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरची कामे अपूर्णावस्थेत असताना व अंदाजपत्रकाप्रमाणे नसताना सुद्धा नगरपरिषदेचे मुख्याधिकारी तथा प्रशासक यांनी या कामाची मोठ्या प्रमाणामध्ये देयके काढली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त तीनही योजनेंची कामे अपूर्ण व निकृष्ट दर्जाची झालेली असताना व त्यामध्ये मोठ्या प्रमाणात अनियमितता झाल्यामुळे शासकीय निधीचा अपव्यय होत असून, शासनाने सदर प्रकरणाची दखल घेऊन दोषी आढळून आलेल्या संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियानंतर्गत आर्वी शहराच्या पाणीपुरवठा प्रकल्पास प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्यात आली असून प्रस्तुत प्रकल्पाची एकूण भौतिक प्रगती ९२% आणि जलशुद्धीकरण केंद्राच्या कामाची ७०% प्रगती झाली आहे.

महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियानंतर्गत आर्वी शहराच्या मलनिःस्सारण प्रकल्पास प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्यात आली असून प्रस्तुत प्रकल्पातील मलप्रक्रिया केंद्राची जागा उपलब्ध न झाल्यामुळे झोन-१ मधील कामे रद्द करण्यात आलेली असून झोन-२ मधील कामाची भौतिक प्रगती ७४ % झालेली असल्याचे नगरपरिषदेने कळविले आहे.

(२) आर्वी शहराच्या पाणीपुरवठा प्रकल्पाचे काम पूर्ण ठेव तत्वावर महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत करण्यात येत असून प्रकल्पाची कामे ज्या प्रमाणात होतात त्यांची प्रत्यक्ष मोजमापे मोजमाप पुस्तिकेमध्ये नोंदवून विहित पद्धतीने तपासणी करूनच कंत्राटदाराला मजीप्रामार्फत अदा करण्यात येतात.

आर्वी शहराच्या मलनिःस्सारण प्रकल्पाचे काम नगरपरिषद मार्फत राबविण्यात येत असून प्रस्तुत प्रकल्पात मजीप्रा प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून काम पाहते. प्रस्तुत प्रकल्पातील कामे ज्या प्रमाणात होतात त्यांची प्रत्यक्ष मोजमापे मोजमाप पुस्तिकेमध्ये नोंदवून विहित पद्धतीने तपासणी करूनच मजीप्रामार्फत नगरपरिषदकडे पाठविण्यात येतात. उक्त दोन्ही योजनेची कामे पूर्ण झाल्यानंतर व अंदाजपत्रकाप्रमाणे असल्याचे निदर्शनास आल्यानंतरच देयके अदा करण्यात आलेली आहेत. तसेच, कंत्राटदारामार्फत झालेल्या विलंबास अनुसरून नगरपरिषद मार्फत दंडात्मक कारवाई करण्यात आलेली आहे.

(३) व (४) प्रस्तुत दोन्ही प्रकल्पातील कामांचे त्रयस्थ तपासणी शासकीय तंत्रनिकेतन अमरावती यांचेमार्फत करण्यात आली असून योजनेची कामे निकृष्ट दर्जाची झाल्याचे आढळून आलेले नाही. तसेच, प्रकल्पातील कामामध्ये कुठलीही अनियमितता व शासकीय निधीचा अपव्यय झाल्याचे दिसून येत नसल्याचे आर्वी नगरपरिषदेने आणि महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने कळविले आहे.

-----------------

## कळवण (जि.नाशिक) तालुक्यात धान्य खरेदीसाठी शेतकऱ्यांच्या ऑनलाईन नोंदणीसाठी मुदतवाढ देण्याबाबत

**(२१) * ७०४३ श्री.संजय केणेकर :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खरीप पणन हंगाम सन २०२४-२०२५ अंतर्गत शासनाच्या आधारभूत किंमत खरेदी योजनेंतर्गत धान, मका, सोयाबीन, भात, ज्वारी भरड धान्य खरेदीसाठी शेतकऱ्यांची ऑनलाईन नोंदणी करण्याकरीता दिनांक ३१ डिसेंबर, २०२५ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नाशिक जिल्ह्यातील कळवण तालुक्यातील अनेक शेतकऱ्यांना विविध तांत्रिक अडचणी, कागदपत्रांची पूर्तता, सर्व्हर डाऊन तसेच इतर कारणांमुळे वेळेत नोंदणीसाठी अडचणी निर्माण होत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने जोपर्यंत शेतकऱ्यांची ऑनलाईन नोंदणी पूर्ण होत नाही तोपर्यंत ऑनलाईन नोंदणीसाठी मुदतवाढ द्यावी अशी मागणी तालुक्यातील शेतकऱ्यांकडून होत असल्याची बाब माहे डिसेंबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर शेतकऱ्यांना ऑनलाईन नोंदणीसाठी मुदतवाढ देण्याबाबतची मागणी पूर्ण करण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.छगन भुजबळ :** (१) हे खरे आहे.

३१ डिसेंबर नंतर देखील खरीप पणन हंगाम २०२५-२६ करीता धान, भरडधान्य (मका, ज्वारी, बाजरी, रागी) व सोयाबीन खरेदीसाठी शेतकऱ्यांची ऑनलाईन नोंदणी करण्यासाठी दिनांक ३१ जानेवारी, २०२६ पर्यंत मुदत देण्यात आली होती.

(२) हे खरे नाही.
(३) व (४) धान, भरडधान्य (मका, ज्वारी, बाजरी, रागी) व सोयाबीन खरेदीसाठी शेतकऱ्यांची ऑनलाईन नोंदणी करण्यासाठी दिनांक ३१ जानेवारी, २०२६ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## ज्येष्ठ नागरिकांना निवाऱ्यासाठी तयार करण्यात आलेल्या गृहनिर्माण सर्वसमावेशक धोरणाची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याबाबत

**(२२) * ७२५८ श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, श्री.विक्रांत पाटील, श्री.संजय केणेकर, श्रीमती उमा खापरे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गृहनिर्माण पुनर्विकास प्रकल्पास विलंब झाल्यास ज्येष्ठ नागरिकांना समस्या उद्भवू नयेत यासाठी त्यांच्या निवाऱ्याच्यादृष्टीने सर्वकष धोरणाची अंमलबजावणी करण्याच्या मा.मुंबई उच्च न्यायालयाने शासनास दिलेल्या आदेशानुसार गृहनिर्माण प्रकल्प नियोजन समिती स्थापन करण्याचा निर्णय घेतला असल्याची बाब माहे डिसेंबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, प्रलंबित असलेल्या पुनर्वसन प्रकल्पांची माहिती (विदा) जमा करुन तसेच वर्षानुवर्षे प्रलंबित पुनर्विकास प्रकल्प पूर्ण करण्याच्यादृष्टीने उपाययोजना सुचविण्याचे काम शासन या समितीकडे सोपविणार असून समितीमार्फत अद्याप याबाबतचे काम सुरु झालेले नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, ज्येष्ठ नागरिकांचा समावेश असलेले गृहनिर्माण प्रकल्प तातडीने पूर्ण करण्याच्यादृष्टीने तसेच ज्येष्ठ नागरिकांच्या निवाऱ्यासाठी तयार करण्यात आलेल्या गृहनिर्माण धोरणांची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) मा.मुंबई उच्च न्यायालयाने रिट याचिका २५८६/२०२४ मध्ये दिनांक ०७/०२/२०२४ रोजी दिलेल्या आदेशामध्ये राज्यातील गृहनिर्माण पुनर्विकास प्रकल्पास विलंब होऊन ज्येष्ठ नागरिकांना त्रास होता कामा नये, यासाठी ज्येष्ठ नागरिकांना निवाऱ्याच्यादृष्टीने धोरणाची निर्मिती करण्याबाबत सूचित केले होते. त्यानुसार म्हाडा प्राधिकरण व त्याअंतर्गत असलेल्या विभागीय मंडळांनी राज्य शासनाच्या सर्वसमावेशक ज्येष्ठ नागरिकांच्या धोरणाबाबत आवश्यक ती कार्यवाही करण्याबाबतच्या सूचना शासनाच्या दिनांक ०४/०३/२०२४ च्या परिपत्रकान्वये देण्यात आल्या आहेत. तथापि, सदर परिपत्रक हे फक्त म्हाडा प्राधिकरणास लागू असल्याने मा.उच्च न्यायालयाने दिनांक ०७/०३/२०२४ रोजी दिलेल्या आदेशानुसार कार्यवाही करण्याबाबत नगरविकास विभाग व झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांना शासनाच्या दिनांक २२/०३/२०२४ च्या पत्रान्वये कळविण्यात आले होते.

तसेच, मा.मुंबई उच्च न्यायालयाने रिट याचिका ३७९०३/२०२५ मध्ये दिनांक ०८/१२/२०२५ रोजी दिलेल्या आदेशानुसार दिनांक १५/१२/२०२५ रोजी शासन परिपत्रक निर्गमित करण्यात आले असून, त्यामध्ये झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण स्तरावर प्रकल्प अंमलबजावणी व नियंत्रण समिती गठीत करण्यात यावी असे नमूद करण्यात आले आहे. त्यानुसार झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण स्तरावर प्रकल्प अंमलबजावणी व नियंत्रण समिती गठीत करण्यात आली आहे.

(२) हे खरे नाही.
(३) म्हाडा प्राधिकरणांतर्गत असलेल्या विभागीय मंडळामध्ये ज्येष्ठ नागरीकांच्या तक्रारींच्या अनुषंगाने गठीत समित्यामार्फत सुनावण्या घेऊन तक्रारीचे निराकरण करण्यात येते.

प्राधिकरण पुनर्विकास प्रकल्प राबवितांना ज्येष्ठ नागरीकांच्यादृष्टीकोनातून आवश्यक त्या सोई सुविधा उपलब्ध करून देण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. रॅम्प, लिफ्ट व इतर सुविधा उपलब्ध करून देण्यात येतात.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अहिल्यानगर जिल्ह्यातील अपंग निराधार योजनेच्या लाभार्थ्यांचे आधार प्रमाणीकरण करुन अर्थसहाय्य देण्याबाबत

**(२३) * ६६९३ श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **विशेष सहाय्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अहिल्यानगर जिल्ह्यात ‘अपंग निराधार’ योजनेचा लाभ घेणाऱ्या १६ हजार ५४६ लाभार्थ्यांची प्रमाणपत्रे तपासणी करण्याकरीता जिल्हा शासकीय रुग्णालयाकडे पाठविण्यात आली असता त्यापैकी ६ हजार ३७२ लाभार्थ्यांकडे अद्याप ‘यूडीआयडी’ (UDID) नसल्याची बाब माहे डिसेंबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर ६ हजार ३७२ लाभार्थ्यांनी सन २०१८ पासून अद्याप ‘यूडीआयडी’(UDID) कार्ड सादर न केल्यामुळे ते बोगस लाभार्थी असण्याची दाट शक्यता असून, याद्वारे शासकीय निधीचा मोठ्या प्रमाणावर अपव्यय व अपहार होत असल्याने बनावट प्रमाणपत्राच्या आधारे योजनेचा लाभ घेणाऱ्या ८ लाभार्थ्यांविरुद्ध गुन्हे दाखल करण्यात आले असून, अशा बेकायदा कृत्यांमुळे व प्रशासकीय दुर्लक्षामुळे शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या नियमांचे उल्लंघन होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, केवायसी व आधार प्रमाणीकरण प्रक्रियेतील त्रुटींमुळे अनेक लाभार्थ्यांना वाढीव मानधनापासून वंचित राहावे लागत असून, या संपूर्ण प्रक्रियेतील दिरंगाईमुळे योजनेच्या मूळ उद्देशाला बाधा येत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व चौकशीच्या अनुषंगाने बनावट प्रमाणपत्राच्या आधारे योजनेचा लाभ घेणाऱ्या लाभार्थ्यांविरोधात कोणती कारवाई केली तसेच शासकीय निधीचा मोठ्या प्रमाणावर होणारा अपव्यय व अपहार टाळण्याच्यादृष्टीने व केवायसी व आधार प्रमाणीकरण प्रक्रियेतील त्रुटीं दूर करुन सदरहू योजनेचा लाभ पात्र लाभार्थ्यांना मिळण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.नरहरी झिरवाळ :** (१) होय, अंशत: खरे आहे.
(२) हे खरे नाही.

अहिल्यानगर जिल्ह्यात संजय गांधी निराधार अनुदान योजनेंतर्गत दिव्यांग लाभार्थ्यांची पडताळणी मोहीम राबविण्यात आली. यामध्ये एकूण ११ लाभार्थी बनावट असल्याचे आढळून आले आहे. त्यापैकी ८ लाभार्थ्यांवर बनावट सिद्ध झाल्यानंतर गुन्हे दाखल करण्यात आले असून, उर्वरित ३ लाभार्थ्यांची जिल्हास्तरावर चौकशी सुरु आहे.
(३) काही दिव्यांग लाभार्थ्यांना वैश्विक दिव्यांग ओळखपत्र (UDID कार्ड) व्हेरिफिकेशन होत नसल्यामुळे मानधनापासून वंचित रहावे लागत आहे. तथापि, वैश्विक दिव्यांग ओळखपत्र (UDID कार्ड) तसेच आधार प्रमाणीकरण झालेल्या पात्र दिव्यांग लाभार्थ्यांना वाढीव मानधन वितरित करण्यात येत आहे.
(४) विशेष सहाय्य योजनेतील बनावट लाभार्थ्यांचा शोध घेण्यासाठी जिल्हाधिकारी, अहिल्यानगर यांच्यामार्फत विशेष मोहिम राबविण्यात आली असून, जे लाभार्थी तपासणीत अपात्र/बनावट आढळले आहेत त्यांचे नाव योजनेतून वगळण्यात आले आहे. तसेच त्यांच्यावर नियमानुसार कायदेशीर कारवाई करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील अल्पसंख्याक बहुल नागरी क्षेत्रात क्षेत्रविकास कार्यक्रम राबविण्यासाठी अनुदान वितरित करण्याबाबत

**(२४) * ७८७२ श्री.पंकज भुजबळ, श्री.अमोल मिटकरी, श्री.इद्रिस नायकवडी :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) येवला (जि.नाशिक) नगरपरिषद क्षेत्रातील अल्पसंख्याक बहुल नागरी क्षेत्रात क्षेत्रविकास कार्यक्रम राबविण्यासाठी असलेल्या योजनेमधून पूर्ण झालेल्या कामांसाठी अनुदान वितरित करण्याची मागणी मा.जिल्हाधिकारी, नाशिक यांनी दिनांक ३० मार्च, २०२५ रोजी वा त्यासुमारास शासनाकडे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त बहुल नागरी क्षेत्रविकास कार्यक्रम राबविण्यासाठी असलेल्या योजनेमधून पूर्ण झालेल्या कामांचे प्रलंबित अनुदान तातडीने वितरित करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधीनी दिनांक १४ ऑक्टोबर, २०२५ रोजी वा त्यासुमारास मा.मंत्री अल्पसंख्याक विकास यांना निवेदन देवूनही अद्याप कोणत्याही प्रकारची कार्यवाही केली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, येवला (जि.नाशिक) नगरपरिषद क्षेत्रातील अल्पसंख्याक बहुल नागरी क्षेत्रात क्षेत्रविकास कार्यक्रम राबविण्यासाठी असलेल्या योजनेमधून पूर्ण झालेल्या कामांसाठी तातडीने अनुदान वितरित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती सुनेत्रा पवार :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) सदर योजनेंतर्गत २०२५-२६ या आर्थिक वर्षातील निधी उपलब्धतेनुसार, जिल्हाधिकारी, नाशिक यांनी सादर केलेल्या प्रस्तावावर उचित कार्यवाही करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## जळगाव जिल्ह्यातील राज्य उत्पादन शुल्क विभागातील रिक्त पदे भरण्याबाबत

**(२५) * ७९८३ श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगाव जिल्ह्यात राज्य उत्पादन शुल्क विभागाची बहुतांश पदे रिक्त असल्याने पुरेशा मनुष्यबळाअभावी अवैधरित्या होणारी मद्य निर्मिती व वाहतुकीवर नियंत्रण करणे, विशेष भरारी पथके नेमून कारवाई करणे शक्य होत नसल्याची बाब दिनांक २० डिसेंबर २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रिक्त पदांमुळे अवैध मद्य निर्मिती व तिच्या वाहतुकीवर नियंत्रण होत नसल्याने वैध मद्य विक्री कमी प्रमाणात होऊन त्याचा शासनाच्या महसूल वाढीवर परिणाम होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्य उत्पादन शुल्क विभागातील रिक्त पदे तातडीने भरून अवैध मद्य निर्मिती व वाहतुकीवर नियंत्रण ठेवण्यासाठी विशेष भरारी पथके नेमून कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती सुनेत्रा पवार :** (१) व (२) हे खरे नाही.

जळगाव जिल्ह्यात राज्य उत्पादन शुल्क विभागाकरीता एकूण ८६ पदे मंजूर असून त्यापैकी ५१ पदे कार्यरत आहेत आणि उपलब्ध मनुष्यबळाच्या माध्यमातून अवैध मद्य निर्मिती व वाहतुकीवर प्रभावी नियंत्रण ठेवण्यात येत आहे. त्यानुसार सन २०२५-२६ या वर्षात एकूण १८७२ गुन्हे नोंदविण्यात आलेले असून १८३३ आरोपींना अटक करण्यात आलेली आहे. जळगाव जिल्ह्यात वैध मद्य विक्रीमध्ये गतवर्षीच्या तुलनेत वाढ नोंदविण्यात आलेली असून त्यामुळे शासनाच्या महसुलात वाढ झालेली आहे.

(३) जळगाव जिल्ह्यात सद्य:स्थितीत ४ कार्यकारी निरीक्षक घटक, १ भरारी पथक व २ सीमा तपासणी नाके यांच्यामार्फत अवैध मद्य निर्मिती, विक्री व वाहतूकीविरुद्ध कारवाया करण्यात येतात. याशिवाय प्रकरणपरत्वे विभागीय भरारी पथक व राज्य स्तरीय भरारी पथक यांच्याकडूनही कारवाया करण्यात येतात. तसेच अवैध धंद्याविरुद्ध प्रभावी नियंत्रण ठेवण्याच्यादृष्टीने राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या दिनांक ३१ जुलै, २०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये १२३२ नवीन पदे निर्माण करण्यात आली असून सदर पदे भरण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील शक्तीपीठ महामार्गाला समांतर असलेल्या नागपूर-रत्नागिरी महामार्गाचा आठपदरी विस्तार करण्याबाबत

**(२६) * ८३३४ श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, श्री.जयंत आसगावकर, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शक्तिपीठ महामार्गाला समांतर रत्नागिरी ते नागपूर हा महामार्ग अस्तित्वात असताना राज्यातील जनतेवर रुपये एक लाख कोटी एवढ्या कर्जाचा भार टाकून बागायती जमीन, पर्यावरण, गौण खनिज, वन्यजीव इत्यादी साधनसंपत्तीचे नुकसान करून शक्तीपीठ महामार्ग करण्यात येणार आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सद्य:स्थितीत अस्तित्वात असलेला रत्नागिरी–नागपूर महामार्ग हा कमी रहदारीचा असल्यामुळे तोट्यात चालला असून सदर महामार्गाचे रुंदीकरण करण्यास सहापदरी तसेच आठपदरीच्या अनुषंगाने जमीन संपादन केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सुमारे तीस हजार कोटी रुपये खर्च करुन चौपदरीकरण करण्यात आलेल्या नागपूर ते रत्नागिरी या राष्ट्रीय महामार्गाला रुपये ८६ हजार कोटी एवढ्या रकमेचा खर्च होणार असून या महामार्गाचा लाभ प्रत्यक्षपणे मिळणार नसल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, कुठल्याही देवस्थान समिती अथवा भक्तांनी मागणी केली नसताना शक्तीपीठ महामार्ग तयार केला जात असून पवनार ते पत्रादेवी पर्यंत असणारे सर्व देवस्थान हे रत्नागिरी-नागपूर या सध्या अस्तित्वात असलेल्या महामार्गालगत असून, कोणत्याही देवस्थानला दर्शनासाठी जात असताना वाहतूकीची कोंडी उद्‌भवत नाही, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, या महामार्गामुळे कित्येक एकर पिकाऊ शेतजमीन बाधित होऊन शेतकऱ्यांचे अपरिमित नुकसान होणार असून शासनाने सदर शक्तीपीठ महामार्ग रद्द करुन अस्तित्वात असलेला नागपूर-रत्नागिरी महामार्गाचा आठपदरी विस्तार करण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) महाराष्ट्र शक्तीपीठ महामार्ग प्रवेश नियंत्रित द्रुतगती मार्ग असून तो पवनार, जि.वर्धा येथे सुरु होऊन पत्रादेवी, जि.सिंधुदूर्ग गोवा हद्दीपर्यंत आहे. सदर महामार्गामुळे नागपूर ते गोवा हा सद्य:स्थितीमधील १८ तासांचा प्रवास साधारणत: ८ तासांवर येणे अपेक्षित आहे. तसेच या महामार्गाची आखणी करताना कमीत कमी बागायती जमिनी संपादन करण्याचा व वन्यजीव याबाबत नियमांनुसार आवश्यक त्या सर्व परवानग्या घेण्याबाबत कार्यवाही सुरु आहे.
(२) व (३) रत्नागिरी ते नागपूर दरम्यान अस्तित्वात असलेल्या रत्नागिरी ते सोलापूर राष्ट्रीय महामार्ग क्र.१६६, सोलापूर ते तुळजापूर राष्ट्रीय महामार्ग क्र.५२, तुळजापूर ते बुटीबोरी (नागपूर) राष्ट्रीय महामार्ग क्र.३६१ हे भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण (NHAI) यांच्या अखत्यारीत असून त्यांच्याकडून प्राप्त माहितीनुसार महामार्गाची एकूण लांबी ९२५.७१५ कि.मी. आहे. सदर महामार्ग बहुतांशी चौपदरी असून या महामार्गासाठी ६० मी/ ४५ मी रुंदीने भूसंपादन केलेले आहे/ करण्यात येत आहे. सदर राष्ट्रीय महामार्ग प्रकल्पाची एकूण किंमत रुपये २९३३२ हजार कोटी इतकी आहे. सद्य:स्थितीत NHAI मार्फत या राष्ट्रीय महामार्गांचे ६/८ पदरीकरण करण्याचे प्रस्तावित नाही.
(४) शक्तीपीठ महामार्गासाठी सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करताना IRC मानकाप्रमाणे वाहतूक वर्दळीचा अभ्यास करण्यात आला असून वळती होणारी वाहतूक व भविष्यात होणारी संभाव्य वाढ विचारात घेऊन सहापदरी द्रुतगती महामार्गाचे नियोजन करण्यात आलेले आहे. तसेच या महामार्गामुळे विविध देवस्थाने व तिर्थक्षेत्रे जोडली जाणार आहेत.

(५) शक्तीपीठ महामार्गाची आखणी विविध पर्यायांचा अभ्यास, स्थानिक भूधारक व लोकप्रतिनिधी यांच्याशी विचारविनिमय करुन नियोजित करण्यात आली आहे. सदर महामार्गासाठी आवश्यक असणारी जमीन ही शासनाच्या प्रचलित नियमानुसार भूधारकांना योग्य तो मोबदला देऊन संपादित करण्यात येणार आहे. सदर महामार्ग हा प्रवेश नियंत्रीत शिघ्रसंचार द्रुतगती मार्ग स्वरुपाचा आहे. नागपूर-रत्नागीरी दरम्यान असलेल्या अस्तित्वावतील राष्ट्रीय महामार्ग हे प्रवेश नियंत्रीत स्वरुपाचे नसून ते केंद्र शासनाच्या राष्ट्रीय महामार्गांच्या नेटवर्कचा भाग आहेत.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पिंपरी चिंचवड महानगरपालिका अंतर्गत रहाटणी येथील रस्त्याचे रुंदीकरण आणि काँक्रीटीकरण पूर्ण करण्याबाबत

**(२७) * ८३९८ श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, अॅड.निरंजन डावखरे, श्री.सदाशिव खोत, डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेंतर्गत रहाटणी येथील प्रभाग क्रमांक २७ मध्ये डीपी रस्त्याचे रुंदीकरण आणि काँक्रीटीकरण प्रलंबित असून रस्ता खड्डामय झाल्यामुळे नागरिकांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत असल्याची बाब माहे डिसेंबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, रहाटणी गावठाण ते छत्रपती शिवाजी महाराज चौक रस्त्यावर ३० ते ४० मीटर रुंदीकरण, महानगरपालिकेच्या शाळेचे इमारतीचे विस्तारीकरण अशा अनेक समस्या वर्षानुवर्षे प्रलंबित असून त्यामुळे वाहतूक कोंडी होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेअंतर्गत परिसरातील वाहतूक कोंडी दूर करून पुरेसा पाणीपुरवठा व सांडपाण्याची दुर्गंधी, मोकाट कुत्र्यांचा उपद्रव इ. समस्यांचे निराकरण करण्यासाठी प्रशासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.

रहाटणी गावठाण ते श्री छत्रपती शिवाजी महाराज चौक या रस्त्यावर कोणतेही खड्डे आढळून आले नाहीत.
(२) हे खरे नाही.

श्री छत्रपती शिवाजी महाराज चौकालगत सुमारे ३० ते ४० मी. रस्त्याच्या लांबीमध्ये १८ मी. रुंद रस्त्यापैकी सुमारे ९ मी. रुंद रस्ता विकसीत करण्यात आलेला असून सदर ठिकाणी कोणतीही वाहतूक कोंडी होत नाही.
(३) पाणीपुरवठा विभागाने सदर भागात वितरण नलिका टाकलेल्या असून सद्य:स्थितीत पाणीपुरवठ्याबाबत कोणतीही तक्रार नाही. जलनि:सारण नलिकांचे जाळे अस्तित्वात असून सांडपाण्याच्या दुर्गंधीची समस्या या भागात नाही.

मोकाट कुत्र्यांच्या समस्येबाबत नागरिकांच्या तक्रारीनुसार तात्काळ कार्यवाही करण्यात येत असून सकाळी ७ ते संध्याकाळी ९ पर्यंत श्वान पथके नियमितपणे कार्यरत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुरुड, अलिबाग व पोलादपूर (जि.रायगड) तालुक्यांमध्ये क्रीडा संकुल उभारण्यासाठी जागा उपलब्ध करून देण्याबाबत

**(२८) * ६८६४ श्री.प्रसाद लाड, श्री.प्रविण दरेकर, श्रीमती उमा खापरे, श्रीमती चित्रा वाघ, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत : तारांकित प्रश्न क्रमांक ३१६ ला दिनांक ६ मार्च, २०२५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुरुड, अलिबाग व पोलादपूर (जि.रायगड) या तीन तालुक्यांत क्रीडा संकुल उभारण्यासाठी शासनास जागा प्राप्त झालेली नसल्याने क्रीडा संकुलांचे काम अद्यापही सुरू करण्यात आले नसल्याची बाब माहे डिसेंबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाला रायगड जिल्ह्यातील या तीन प्रमुख तालुक्यांमध्ये क्रीडा संकुल उभारण्यासाठी जागा उपलब्ध न होण्याची कारणे काय आहेत, तसेच जागा उपलब्ध होऊन क्रीडा संकुलाचे बांधकाम करण्यास किती कालावधी लागणार आहे,
(३) असल्यास, मुरुड, अलिबाग व पोलादपूर (जि.रायगड) या तीन तालुक्यांत सुसज्ज, अद्ययावत क्रीडा संकुल असावे, लहान मुलांपासून तरुण, महिला आणि ज्येष्ठांनाही त्याचा लाभ घेता यावा या हेतुने क्रीडा संकुल उभारण्यासाठी उक्त तालुक्यांमध्ये जागा तसेच निधीची उपलब्धता व्हावी याकरीता शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती सुनेत्रा पवार :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) मुरुड, अलिबाग व पोलादपूर (जि.रायगड) या तीन तालुक्यात क्रीडा संकुल उभारण्यासाठी योग्य जागेचा शोध सुरू आहे. जागा उपलब्ध झाल्यावर सदर ठिकाणी संकुल उभारण्याची कार्यवाही करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईत मुलींसाठी सुरु केलेल्या पहिल्या मराठी शाळेच्या इमारतीची दुरवस्था झाल्याबाबत

**(२९) * ६८३३ श्री.श्रीकांत भारतीय :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईचे शिल्पकार जगन्नाथ शंकरशेठ यांनी सन १८४९ मध्ये मुंबईत मुलींच्या शिक्षणाला प्रोत्साहन देण्यासाठी मुलींसाठी पहिली मराठी शाळा सुरू केली हो, सद्य:स्थितीत सदर शाळेतील पायाभूत सुविधा, छत, वर्गखोल्या व स्वच्छतागृहे यांचा अभाव असून शाळेची दुरवस्था झाल्याची बाब माहे नोव्हेंबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर ऐतिहासिक शिक्षण संस्थेच्या इमारतीच्या जतनासाठी, दुरुस्तीसाठी किंवा पुनर्बांधणीसाठी शासनाने मदत अथवा अनुदान योजना उपलब्ध करून दिली आहे काय व त्याचा तपशील काय आहे, नसल्यास त्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, सदर शिक्षण संस्थेचे संवर्धन, पुनरुत्थान आणि वारसा जतन करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.

ही मान्यता प्राप्त खाजगी प्राथमिक शाळा आहे. या शाळेच्या इमारतीस सन २०१४ साली दुरुस्तीची आवश्यकता होती. सदर दुरुस्ती संबंधित शाळा व्ययवस्थापनाने केली आहे. सद्य:स्थितीत शाळा इमारत सुस्थितीत आहे.
(२) ही मान्यता प्राप्त खाजगी प्राथमिक शाळा असून यास प्रचलित धोरणानुसार शासन व महानगरपालिका यांच्याकडून वेतन अनुदान देण्यात येते. याव्यतिरिक्त इतर कोणतेही अनुदान अनुज्ञेय नाही.
(३) अशा प्रकारे कोणताही प्रस्ताव महानगरपालिकेच्या स्तरावर विचाराधीन नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील खेळाडूंना 'आईस हॉकी' क्रीडा प्रकारात प्रतिनिधित्वाची संधी न मिळाल्याबाबत

**(३०)** * **७८३० श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राष्ट्रीय स्पर्धेतील खेलो इंडिया विंटर गेम्समध्ये क्रीडा विभाग व क्रीडा संचालनालयाच्या बेजबाबदार कामकाजामुळे, 'आईस हॉकी स्पर्धा' क्रीडा प्रकारात प्रतिनिधित्व करण्यापासून महाराष्ट्राची संधी हुकली असल्याची बाब दिनांक २२ जानेवारी, २०२६ रोजी निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरचा हा खेळ बंदिस्त स्टेडियममध्ये नियंत्रित तापमानात खेळला जात असल्यामुळे याकरिता लागणारे स्टेडियम उपलब्ध करून देणे आणि त्याची देखभाल करणे आवश्यक असून भारतीय क्रीडा प्राधिकरणातर्फे आईस हॉकी स्पर्धेसाठी महाराष्ट्र संघाची निवड करताना गैरप्रकार झाला असून खेळाडूंची निवड चाचणी बर्फाच्या आईस हॉकी रिंकवर घेण्याऐवजी फरशीवर घेतल्याची बाब निर्दशनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, केवळ १९ खेळाडू या निवड चाचणीकरता उपस्थित राहिले व सर्वांची निवड झाली असून ज्यामुळे ही निवड प्रक्रिया केवळ एक औपचारिकता असल्याची बाब निदर्शनास आली असून याचिकाकर्ते व इतर राष्ट्रीय स्तरावरील खेळाडूंना संधी नाकारली गेली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, जे खेळाडू या क्रीडा प्रकारात अनुभवी आहेत आणि राष्ट्रीय स्तरावर खेळले आहेत, अशा आंतरराष्ट्रीय स्तरावरील खेळाडूंना डावलून चुकीच्या पद्धतीने निवड चाचणी घेण्यात आली असून सदर गैरप्रकरणातील दोषींवर शासनाने कोणती कठोर कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती सुनेत्रा पवार :** (१) हे अंशत: खरे आहे.

प्रस्तुत स्पर्धांचे आयोजन केंद्र शासनामार्फत करण्यात येत असल्याने राज्याच्या क्रीडा विभागाची जबाबदारी ही केवळ संघ पाठविणे, तांत्रिक समिती नियुक्त करुन संघटनेच्या नियमानुसार समितीमार्फत संघ निश्चित करणे यापुरतीच मर्यादित आहे.

दिनांक २० ते २६ जानेवारी, २०२६ या दरम्यान लडाख या ठिकाणी संपन्न होणाऱ्या खेलो इंडिया विंटर गेम्स साठी महाराष्ट्र राज्याचा संघ निवडण्यासाठी आईस हॉकी असोसिएशन ऑफ महाराष्ट्र यांच्या विनंतीनुसार दिनांक १३ जानेवारी, २०२६ रोजी स्व. मिनाताई ठाकरे स्केटींग रिंक, निगडी पुणे या ठिकाणी राज्य संघ निवड चाचणीचे आयोजन करुन राज्याच्या संघाची निवड करण्यात आली होती. तथापि, आईस व्हॉकी संघाच्या निवडीवर आक्षेप घेत ॲड हॉक समितीच्यावतीने निवड चाचणी व संघ निवड विरोधात मा.उच्च न्यायालयात रिट याचिका क्र.८३२/२०२६ दाखल करण्यात आली होती. सदर याचिकेत मा.उच्च न्यायालयाने दिनांक १७/०१/२०२६ रोजीच्या आदेशान्वये राज्याच्या संघ निवडीस स्थगिती दिली असून प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

(२) हे खरे नाही.

स्व. मिनाताई ठाकरे रोलर स्केटींग रिंक ही रोलर स्केटींग खेळासाठीची आधुनिक स्केटींग रिंक तयार केली आहे. या स्केटींग रिंकवर सराव तथा निवड चाचणी घेण्यास राष्ट्रीय फेडरेशनची मान्यता आहे. तसेच गतवर्षीच्या खेलो इंडिया स्पर्धा राज्य निवड चाचणी व राष्ट्रीय आईस व्हॉकी स्पर्धेसाठी राज्य निवड चाचणी या ठिकाणी घेण्यात आली होती.

(३) हे खरे नाही.

खेलो इंडिया राज्य संघ निवड चाचणीसाठी एकूण ३३ खेळाडू उपस्थित होते. परंतु स्पर्धा आयोजकांच्या दिनांक १३ जानेवारी, २०२६ रोजी प्रसिद्ध केलेल्या पत्रानुसार ऐनवेळी वयोमर्यादेची अट लागू केल्याने उपस्थितांपैकी काही खेळाडू वय मर्यादेमुळे निवड चाचणीसाठी पात्र ठरले नाहीत. तसेच राज्य संघ निवड चाचणीसाठी उपस्थित नमूद ३३ खेळाडूंव्यतिरीक्त अंदाजे १५ खेळाडू निवड चाचणीस्थळी उपस्थित होते. तथापि, त्यांनी ॲड हॉक समितीला समर्थन देत सदर निवड चाचणीवर बहिष्कार घातला.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## काटोल-वरूर (जि.नागपूर) मार्गावरील तीन पुलांचे काम अपूर्णावस्थेत असल्याबाबत

**(३१) * ८३६१ श्री.अभिजित वंजारी :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) काटोल-वरूड (जि.नागपूर) मार्गावरील तीन पुलांचे बांधकाम गत सहा वर्षांपासून प्रलंबित असून पारडसिंगा, भारसिंगी व जलालखेडा या मार्गावर सिमेंटचे रस्ते उंच केल्यामुळे शेतांमध्ये जाण्याचा मार्ग बंद झाला असून, स्थानिक शेतकऱ्यांना आणि प्रवाशांना मोठी कसरत करावी लागत आहे असल्याची बाब माहे डिसेंबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर तीनही ठिकाणी असलेल्या जुन्या पुलावरून सध्या वाहतूक सुरू आहे यातील दोन पूल तर खूपच जुने झाले असून तीनही पुलाच्या दोन्ही बाजूने वळणमार्ग असल्यामुळे अनेकवेळा येथे अपघात होत असून यामुळे वाहतूक धोकादायक ठरत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या (NHAI) बांधकाम विभागाचे अधिकारी सदर कामाबाबत गंभीर नसल्याने दिरंगाई होत आहे, त्यामुळे बांधकामाला होणाऱ्या दिरंगाईची उच्चस्तरीय चौकशी करून दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) असल्यास, सदर प्रकरणी तेथील ग्रामस्थांनी अधिकाऱ्यांना पत्र व निवेदने देत वारंवार मागणी करुनही याची दखल घेतली जात नसून सदर पुलांचे व रस्त्याचे बांधकाम दर्जेदार व नियोजित कालावधीत पूर्ण व्हावे, यासाठी शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) असल्यास, काटोल-वरूड (जि.नागपूर) मार्गावरील तीन पुलांचे काम अपूर्ण ठेवणाऱ्या संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले :** (१) हे अंशतः खरे आहे.

काटोल-वरुड कि.मी. ६०/१०० ते कि.मी. १००/५६५ रा.म.क्र.३५३ जे या लांबीतील पेव्हड शोल्डरसह सिमेंट कॉँक्रीट दुपदरीकरणाच्या कामास सन २०१७ मध्ये मंजुरी देण्यात आली होती. सदर कामापैकी ३५.९३५ कि.मी. लांबीतील काम जानेवारी, २०२० मध्ये सार्वजनिक बांधकाम विभागाच्या राष्ट्रीय महामार्ग विभागामार्फत पूर्ण करण्यात आले आहे. उर्वरित ४.५१ कि.मी. लांबीच्या कामांमध्ये पारडसिंगा, भारसिंगी, जलालखेडा येथील पूलांच्या कामांचा अंतर्भाव होता.या कामांसाठी आवश्यक भूसंपादन व वन विभागाच्या परवानगी अभावी सदर कामे पूर्ण करता आली नाहीत.

कि.मी. ६०/१०० ते कि.मी. १००/५६५ या लांबीतील कॉँक्रिटीकरणाचे काम पूर्ण करून विविध ठिकाणी जोडरस्त्यांना पोचमार्ग उपलब्ध करून देण्यात आले आहेत.

(२) हे अंशतः खरे आहे.

सदर अस्तित्वातील तिनही जुन्या पुलांच्या ठिकाणी दोन्ही बाजूचे पोहोच मार्ग वळणावर असल्यामुळे सुधारित संरचनेंतर्गत नवीन रस्ता व पुलांची बांधकामे प्रस्तावित करण्यात आली होती. परंतु भूसंपादनाअभावी सदर कामे करता आली नाहीत.

तथापि, या लांबीतील भागामध्ये नोव्हेंबर २०२५ मध्ये डांबरी नूतनीकरण करण्यात आलेले असून सद्य:स्थितीत अस्तित्वातील डांबरी रस्त्यावरून वाहतूक सुरळीत सुरू आहे. तसेच आवश्यक ठिकाणी सूचनाफलक बसवण्यात आले आहेत.

(३) व (४) रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्रालयामार्फत काटोल-वरुड राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ३५३ जे वरील उर्वरित ४.५१ कि.मी. लांबीतील रस्ता व पुलांच्या बांधकामासाठी रुपये १३६.३५ कोटी रकमेस फेब्रुवारी २०२५ मध्ये प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. त्यास अनुसरून निविदा प्रक्रिया पूर्ण करून न्यूनतम

कंत्राटदारास दिनांक १५ डिसेंबर २०२५ रोजी निविदा स्वीकृती पत्र देण्यात आले असून पुढील आवश्यक कार्यवाही प्रगतीत आहे. सदर कामाची मुदत एक वर्ष आहे.
(५) व (६) पुलाच्या कामासाठी आवश्यक भूसंपादन व वन परवानगी अभावी मूळ मंजुरीतील वावानुसार काम पूर्ण करता आले नाही. तथापि, उर्वरित काम नव्याने मंजूर करून निविदा प्रक्रिया अंतिम टप्प्यात असून काम विहित मुदतीत पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

-----------------

## राज्यात गुटखा व तत्सम प्रतिबंधित पदार्थांची होणारी विक्री रोखण्यासाठी प्रभावी उपाययोजना करण्याबाबत

**(३२) * ७१२५ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.राजेश राठोड, श्री.अभिजित वंजारी, श्री.धीरज लिंगाडे, श्री.जयंत आसगावकर, श्री.सुधाकर अडबाले :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात मुंबई, ठाणे, पालघर ग्रामीण व शहरी भागातील गुटखा व तत्सम प्रतिबंधित पदार्थांची पानपट्टी दुकानांवर सर्रासपणे विक्री होत असून भिवंडीत (जि.ठाणे) ३ टेम्पोंसह ५५ लाखांचा गुटखा जप्त करण्यात आला असल्याची बाब माहे डिसेंबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गुटखा व तत्सम प्रतिबंधित पदार्थांची राज्यात ट्रेन, पानपट्टी, एस.टी.स्टॅन्ड, कॉलेज येथील सार्वजनिक ठिकाणी सर्रासपणे विक्री होत असून राज्यात विशेषत: भिवंडी, ठाणे पालघर, बोईसर व डहाणू या परिसरात गुटखा व तत्सम प्रतिबंधित पदार्थांच्या अवैध साठ्याची वाहतूक होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, संबंधित क्षेत्रातील जबाबदार अधिकाऱ्यांचे निलंबनाची कारवाई करण्याचा निर्णय शासनाने घेतला असून सदर निर्णयाच्या अनुषंगाने राज्यात गुटखा व तत्सम अंमली पदार्थांची छुप्या पद्धतीने व अवैध मार्गाने विक्री, साठा व वाहतूक करणाऱ्या व्यावसायिकांवर तसेच संबंधित क्षेत्रातील जबाबदार अधिकाऱ्यांवर व इतर किती जणांविरुद्ध आतापर्यंत कारवाई करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.नरहरी झिरवाळ :** (१) अंशतः खरे आहे.

ठाणे येथून दिनांक ०२/१२/२०२५ रोजी नाशिक मुंबई हायवे वरील सोनाळे गावाच्या हद्दीत रुपये २१,१२,२५०/-किंमतीचा प्रतिबंधित साठ्यासह टेम्पो वाहन जप्त करण्यात आले आहे. सदर प्रकरणात वाहन चालक व त्याचे साथीदार यांचे विरोधात फिर्याद दाखल (क्रमांक ६१४/२०२५) करण्यात आली आहे.

दिनांक ०२/१२/२०२५ रोजी शेलार पोलीस चौकीसमोर, ता.भिवंडी, जि.ठाणे येथून मालवाहू वाहनातून रुपये ५८,८२,२०८/- किंमतीचा प्रतिबंधित साठा व वाहन जप्त करण्यात आले आहे. सदर प्रकरणात वाहन चालकाविरोधात फिर्याद दाखल (क्र.६१५/२०२५) करण्यात आली आहे.

तसेच दिनांक २२/१२/२०२५ रोजी ०२ वाहनांवर कारवाई करण्यात आली असून एकूण २०,४१,२००/- इतक्या किमतीचा प्रतिबंधित अन्न पदार्थाचा साठा व वाहने जप्त करण्यात आली आहेत. तसेच वाहनचालकांविरोधात प्रथम खबरी अहवाल क्र. ६६३/२०२५ नोंदविण्यात आले आहेत.

(२) व (३) कोकण विभागात ठाणे, पालघर, भिवंडी या कार्यक्षेत्रात अन्न सुरक्षा अधिकारी यांनी १ एप्रिल, २०२५ ते ३१ जानेवारी, २०२६ या कालावधीत प्रतिबंधित अन्नपदार्थ प्रकरणी ७१ ठिकाणी कारवाई करून ७,१४,३८,४०२/- इतक्या किंमतीचा प्रतिबंधित अन्नपदार्थांचा साठा जप्त करण्यात आला आहे. तसेच, ५६ इसमांविरुद्ध प्रथम खबरी अहवाल नोंदविण्यात आले असून २४ वाहने जप्त करण्यात आली आहेत.

अन्न व औषध प्रशासनामार्फत दिनांक १९/१२/२०२५ रोजीच्या परिपत्रकानुसार प्रशासनातील सर्व संबंधित अधिकारी यांना त्यांचे कार्यक्षेत्रातील प्रतिबंधित अन्नपदार्थांची चोरी छुपे व अवैध मार्गाने विक्री, साठा व वाहतूक करणाऱ्या व्यावसायिकांवर प्रभावीपणे कारवाई करणे तसेच, प्रतिबंधित अन्नपदार्थांची विक्री, साठा व वितरण होणार नाही. याबाबत दक्षता घेण्याचे व प्रतिबंधित अन्नपदार्थांचे बंदीबाबत आदेशाची प्रभावी अंमलबजावणी करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. त्यानंतरही त्यांचे कार्यक्षेत्रात प्रतिबंधित अन्नपदार्थांची विक्री, साठा व वितरण होत असल्याचे निदर्शनास आल्यास त्या कार्यक्षेत्रातील सर्व संबंधित अधिकारी यांना जबाबदार धरण्यात येईल, अशा आशयाच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## खारघर (नवी मुंबई) येथील मलनिःसारण प्रक्रिया केंद्रातून निर्माण होणाऱ्या दुर्गंधीमुळे नागरिकांच्या आरोग्यावर परिणाम होत असल्याबाबत

**(३३) * ७१५८ डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.कृपाल तुमाने :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खारघर (नवी मुंबई) येथील सेक्टर १५ वसाहतीलगत सिडकोने उभारलेले मलनिःसारण प्रक्रिया केंद्र नागरिक व शालेय विद्यार्थ्यांसाठी आरोग्यदायी वातावरण राखण्यास अपयशी ठरत असून सदर परिसरात नामांकित शाळा असून ४० हजारांहून अधिक नागरिक व शाळकरी विद्यार्थ्यांच्या आरोग्यावर वाढत्या दुर्गंधीचा प्रत्यक्ष परिणाम होऊन आरोग्यविषयक समस्या उद्‌भवत असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सिडको प्रशासनाने मलनिःसारण प्रक्रिया केंद्राची कार्यपद्धती तपासून तांत्रिक सुधारणा, दुर्गंधी नियंत्रण उपाय, नियमित देखभाल करावी अशी मागणी परिसरातील नागरिकांकडून होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, भविष्यात अशा प्रकारच्या मलनिःसारण केंद्रांसाठी कोणते पर्यावरणीय नियम किंवा तंत्रज्ञान लागू करण्याचे शासनाच्या विचाराधीन आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी महानगरपालिकेच्या महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने (MPCB) किंवा संबंधित प्रशासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) यासंदर्भातील निवेदन प्राप्त आहे. तथापि, खारघर, सेक्टर-१५ मधील मलनिःसारण केंद्र हे एस.बी.आर. (SBR) या अद्यावत तंत्रज्ञानावर आधारित असून ते सिद्ध व मान्यता प्राप्त तंत्रज्ञान आहे. सदर मलनि:सारण प्रक्रिया केंद्रास परिचालन परवानगी (MPCB-Consent to operate) प्राप्त आहे. सदर केंद्रामध्ये प्रक्रिया केलेल्या सांडपाण्यावर साइट प्रयोगशाळा व मानांकीत बाह्य प्रयोगशाळेमध्ये नियमित चाचणी करण्यात येते.

सिडकोकडील प्रकल्पामधून प्रक्रियायुक्त साडंपाण्याच्या नमुन्यांची दरमहा NABL मान्यताप्राप्त बाह्य प्रयोगशाळेमार्फत बीओडी व सीओडी तसेच इतर आवश्यक मानांकणासाठी तपासणी करण्यात येते. सदर तपासणी अहवालानुसार यातील निष्कर्ष MPCB यांनी निर्धारित केलेल्या मानकाच्या मर्यादेत आहेत.

या बाबतीत चाचणी अहवालाच्या दृढीकरणासाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाला सांडपाण्याचा नमुना सिडको व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या अधिकाऱ्यासमवेत संयुक्तरीत्या संकलित करून तो NABL मान्यताप्राप्त प्रयोगशाळेत तपासणी करण्याबाबत महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाला कळविण्यात आले असून व त्यानुसार प्राप्त निकषानुसार पुढील कार्यवाही करण्याचे प्रस्तावित आहे.

सांडपाणी पंपगृहामध्ये खारघर नोडल क्षेत्रातील संपूर्ण सांडपाणी विद्यमान भूमिगत गटार जाळ्यामार्फत (Sewer-line Network) संकलित करून ते कच्चे सांडपाणी संकलन टाकीत जमा करण्यात येते. त्यानंतर सदर कच्चे सांडपाणी पुढील प्रक्रियेसाठी मलनिःसारण प्रक्रिया केंद्रामधील (द्वितीयक शुद्धीकरण युनिट) शुद्धीकरण प्रकल्पाकडे पंपाद्वारे पाठविण्यात येते. सदर सांडपाण्याचा अखंड वाहता प्रवाह असल्याने मलनिःसारण प्रक्रिया केंद्रामध्ये वास अथवा दुर्गंधी जाणवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## गोंदिया जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयामार्फत राबविण्यात आलेल्या नाविन्यपूर्ण योजनेचा लाभ पात्र विद्यार्थ्यांना दिला नसल्याबाबत

**(३४) * ६६५२ डॉ.परिणय फुके, श्रीमती उमा खापरे, श्री.सदाशिव खोत, श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोंदिया जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयामार्फत स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन कार्यक्रमांतर्गत ५०१ विद्यार्थ्यांना प्रशिक्षण व १५०० विद्यार्थ्यांना अभ्यास साहित्य पुरविण्याच्या योजनेत नियमांचे उल्लंघन करून अनियमितता झाल्याची बाब माहे डिसेंबर, २०२५ मध्ये माहिती अधिकारांतर्गत निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पात्र विद्यार्थ्यांना वैयक्तिक लाभ देण्याऐवजी सुमारे ७५ लाख रुपये किंमतीचे अभ्यास साहित्य संच महाविद्यालयांच्या ग्रंथालयांकडे परस्पर वळवून आणि प्रशिक्षणासाठीच्या निधीचा चुकीच्या पद्धतीने विनियोग करून शासकीय निधीचा अपव्यय व अपहार करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर योजनेची व्यापक प्रसिद्धी न करता आणि विद्यार्थ्यांची पारदर्शक निवड न करताच केवळ कागदोपत्री प्रशिक्षण पूर्ण झाल्याचे दाखवून पात्र ५०१ विद्यार्थ्यांना मार्गदर्शनापासून वंचित ठेवल्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, वाटप केलेल्या पुस्तकांवरील 'क्यूआर कोड' स्कॅन होत नसल्याने व निविदा प्रक्रियेत पात्र वृत्तपत्रांतून जाहिरात प्रसिद्ध करण्याच्या अटींना बगल दिल्याने सदर योजनेच्या मूळ हेतूचे उल्लंघन झाले असून, सदर अनियमिततेस जबाबदार असणाऱ्या संबंधित दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती सुनेत्रा पवार :** (१) व (२) हे खरे नाही.

जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव, जिल्हा नियोजन समिती, गोंदिया यांचे रुपये १.०० कोटीचे प्रशासकीय व निधी मंजूरी आदेशानुसार जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, गोंदिया यांचे मार्फत ई-निविदा प्रसिद्ध करुन आर्थिक व तांत्रिक मुल्यांकनानंतर पुरवठाधारकास कार्यादेश देण्यात आले आहेत.

नाविण्यपूर्ण योजनेत केवळ सामूहिक लाभाच्या योजना घेता येतात. वैयक्तिक लाभ स्वरुपात थेट विद्यार्थ्यांना संच वाटप करणे शक्य नसल्याने, प्राप्त प्रस्ताव व ई-निविदा/कार्यादेशानुसार सरळसेवा परिक्षांसाठी प्रती संच १० पुस्तके असे एकूण २००० संच जिल्ह्यातील सर्व वरिष्ठ महाविद्यालयांना वितरित करण्यात आलेले आहे. वितरण पूर्ण झाल्यानंतर सर्व लाभार्थी महाविद्यालयांकडून संच पोहोच झाल्याची विहित नमुन्यातील प्रमाणपत्रे व अहवाल प्राप्त करुन घेण्यात आला आहे.

(३) हे खरे नाही.

गोंदिया सारख्या दुर्गम जिल्ह्यातील वंचित व गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांना युपीएससी/एमपीएससी वर्णनात्मक परीक्षेसाठी अधिक व्यापक प्रमाणात ऑनलाइन प्रशिक्षण सुविधा मिळाव्यात या उद्देशाने, या संस्थेस ई-निविदा व कार्यादेशात नमूद ५१ विद्यार्थ्यांच्या मर्यादेपलीकडे जाऊन एकूण २०१ विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देण्याची विनंती करण्यात आली आहे. सदर अतिरिक्त विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देण्यासाठी कोणतेही अतिरिक्त मानधन संस्थेस देय नसून, शासनावर कोणताही आर्थिक भार न वाढविता संस्थेने त्यांच्या सामाजिक बांधिलकीतून हे प्रशिक्षण देण्यास सहमती दर्शविली आहे.

(४) सदर कामाची ई-निविदा प्रक्रिया संपूर्णपणे नियमानुसार राबविलेली असून प्रचलित पद्धतीनुसार वृत्तपत्रामध्ये निविदा सूचना प्रसिद्ध करणेबाबत विहित नमुन्यातील पत्र ई-मेलद्वारे महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई यांचे कार्यालायास पाठविण्यात आले होते.

सदर प्रकरणी चौकशी करण्याकरीता जिल्हाधिकारी, गोंदिया यांनी उपविभागीय अधिकारी, गोंदिया यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती स्थापन केली आहे. चौकशी समितीचा अहवाल अद्याप अप्राप्त आहे. चौकशीमध्ये अनियमितता झाल्याचे दिसून आल्यास संबंधितांवर कारवाई करण्यात येईल.

(५) विलंब झालेला नाही.

-----------------

## हिमायतनगर (जि.नांदेड) शहराकरीता पाणीपुरवठा योजनेचे काम पूर्ण करण्याबाबत

**(३५)** * **६७१८ श्री.हेमंत पाटील, श्री.कृपाल तुमाने :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिमायतनगर (जि.नांदेड) शहराकरीता महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान अभियानांतर्गत सन २०१९ मध्ये रुपये १९ कोटी ५९ लाख रुपयांच्या पाणीपुरवठा योजनेला मंजूरी देण्यात आली असून नऊ वर्षांचा कालावधी होवूनही सदर योजनेचे काम अद्यापही पूर्ण झालेले नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, हिमायतनगरमध्ये पाणीटंचाई ही एक मोठी समस्या असून सदर योजना कार्यान्वित झाल्यास नांदेड शहराला पाणीपुरवठा होण्यास मदत होईल, ज्यामध्ये पाइपलाइन टाकणे, जलशुद्धीकरण आणि पाणीसाठा यासाठीच्या सुविधांचा समावेश असेल व रहिवाशांना सुरक्षित आणि पुरेसे पाणी मिळेल, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर योजनेचा उद्देश हा हिमायतनगर शहरासाठी कायमस्वरूपी पाणीपुरवठा सुनिश्चित करणे असून हिमायतनगरमधील नागरिकांसाठी ही एक महत्त्वाची विकास योजना असून, गत नऊ वर्षांपासून प्रलंबित असलेले सदर योजनेचे काम तातडीने पूर्ण करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान अभियानांतर्गत हिमायतनगर शहराच्या रुपये १९.५९ कोटी किंमतीच्या पाणीपुरवठा प्रकल्पास दिनांक २८ मार्च, २०१८ रोजी प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. नगरपंचायतमार्फत सदर प्रकल्पाची निविदा प्रक्रिया राबवून दिनांक ०२ जुलै, २०१९ रोजी कार्यादेश देण्यात आले आहेत.

प्रस्तुत प्रकल्पातील जॅकवेलच्या जागेतील बदलामुळे, पाण्याच्या टाकीच्या व जलशुद्धिकरण केंद्राच्या जागेतील बदलामुळे, कोव्हीड प्रादुर्भावामुळे काम पूर्ण करण्यास विलंब झाला ही वस्तुस्थिती आहे.

(२), (३) व (४) हिमायतनगर नगरपंचायतच्या मालकीच्या ६४ विंधन विहिरी, दोन सार्वजनिक विहिरी द्वारे शहरास सुरळीत पाणीपुरवठा करण्यात येतो. तसेच, शहरात पाणी टंचाई निर्माण झाल्यास खाजगी विहिरी सुद्धा अधिग्रहण करण्यात येतात. त्यामुळे, शहरात पाणी टंचाई निर्माण होत नाही.

महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान अभियानांतर्गत पाणीपुरवठा प्रकल्पाची आजमितीस ९० % भौतिक प्रगती झाली असून उर्वरित कामामध्ये शहरातील पाईप लाईनचे गॅप जोडणे व वॉल्व बसविण्याचे काम शिल्लक असून याबाबत कंत्राटदार व महाराष्ट्र जीवन प्राधिकरणच्या अधिकाऱ्यांसोबत वेळोवेळी बैठकी घेऊन नगरपंचायतमार्फत प्रकल्पाचे काम तात्काळ पूर्ण करण्याच्या सूचना देण्यात आल्या असून माहे एप्रिल, २०२६ अखेर प्रकल्पाचे काम पूर्ण करून शहरास पाणीपुरवठा करण्याचे नगरपंचायतचे नियोजन आहे.

-----------------

## फलटण (जि.सातारा) तहसिल कार्यालयातील ऑनलाईन रेशन कार्ड प्रणालीतील तांत्रिक अडचणी दूर करण्याबाबत

**(३६) * ७७६५ श्री.शशिकांत शिंदे :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) फलटण (जि.सातारा) तहसिल कार्यालयातील पुरवठा कार्यालयात ऑनलाईन रेशन कार्डकरीता अर्ज करुनही रेशन कार्ड मंजूर होत नसून शासनाने रेशन कार्ड प्रक्रियेत पारदर्शकता आणि वेग येईल या उद्देशाने सुरु केलेली ऑनलाईन अर्ज प्रणालीमुळे सामान्य नागरिकांना अनेक समस्या उद्‌भवत असल्याची बाब माहे जानेवारी, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ऑनलाईन अर्ज करुनही तांत्रिक त्रुटी, ई-केवायसी (e-KYC) अडचणी, सर्व्हर डाऊन असणे आणि डिजिटल साक्षरतेचा अभाव यामुळे सामान्य नागरिकांना रेशन कार्ड मिळवणे किंवा अपडेट करणे कठीण झाले आहे या समस्यांमुळे लाभार्थ्यांना अनेकदा फलटण तहसिल कार्यालयात पुरवठा विभाग आणि स्वस्त धान्य दुकानांत वारंवार फेऱ्या माराव्या लागत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, ऑनलाईन रेशनकार्डच्या सेवेमधील त्रुटी दूर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.छगन भुजबळ :** (१) अंशतः खरे आहे. फलटण तहसिल कार्यालयांतर्गत ऑनलाइन रेशन कार्ड प्रणालीमध्ये जानेवारी, २०२६ दरम्यान काही तांत्रिक अडचणी उद्भवल्या होत्या. ऑनलाईन अर्जाची संख्या अधिक असल्याने आणि RCMS पोर्टलवरील सर्व्हरच्या संथ गतीमुळे काही अर्ज प्रलंबित राहिले होते. तथापि, RCMS प्रणाली वरील तांत्रिक अडचणी दूर करून प्रलंबित अर्जावर कार्यवाही करण्यात आली.
(२) खरे आहे, लाभार्थ्यांच्या ई-केवायसी (e-KYC) प्रक्रियेत आधार डेटा जुळत नसल्याने तांत्रिक त्रुटी निर्माण झाल्या होत्या. ग्रामीण भागात डिजिटल साक्षरतेच्या अभावामुळे नागरिकांना सुरुवातीला काही अडचणी आल्या, ही बाब निदर्शनास आली आहे.
(३) फलटण कार्यालयाद्वारे प्रलंबित अर्जाचा निपटारा करण्यासाठी तहसिल कार्यालयात अतिरिक्त पथक नियुक्त करून विशेष मोहीम राबवण्यात आली आहे.

डिजिटल साक्षरतेचा अभाव असलेल्या नागरीकांकडून तहसिल कार्यालयात ऑफलाईन अर्ज स्विकृत करून सदर अर्जाची RCMS डाटा एन्ट्री करून ई-शिधापत्रिका वितरित करण्याच्या सूचना दिनांक १९/१२/२०२५ रोजीच्या पत्रान्वये देण्यात आल्या आहेत.

लाभार्थ्यांना ई-केवायसीसाठी मदत व्हावी, याकरीता सर्व स्वस्त धान्य दुकानदारांना प्रशिक्षण देण्यात आले आहे. नागरिकांच्या तक्रारींचे त्वरित निवारण करण्यासाठी स्वतंत्र मदत कक्ष (Help Desk) कार्यान्वित करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रात सार्वजनिक शौचालयांची सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत

**(३७)** * **७८१३ श्री.अमोल मिटकरी, श्री.विक्रम काळे, श्री.शिवाजीराव गर्जे, श्री.इद्रिस नायकवडी, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रात पुरेशी सार्वजनिक शौचालये नसल्यामुळे नागरिकांना मूलभूत समस्या उद्भवत असून स्वच्छ भारत अभियानातील निकषानुसार १०० ते ४०० पुरुषांसाठी एक तर १०० ते २०० महिलांसाठी १ शौचकुप असणे आवश्यक असताना प्रत्येकी एका शौचकुपाचा ७५२ पुरुष तर १८२० महिला वापर करीत असल्याचे सन २०१८ ते २०२४ या कालावधीतील सर्वेक्षणात निर्दशनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बृहन्मुंबई महानगरपालिका (BMC) क्षेत्रात स्वच्छ भारत अभियानाच्या निकषांनुसार सार्वजनिक शौचालयांचा मोठा अभाव असून, १,५०० पुरुष आणि सुमारे ८०० ते ९०० महिलांमागे प्रत्येकी केवळ एक शौचकुप वापरला जात असून यामुळे मुंबईकरांची, विशेषतः महिलांची गैरसोय होत असून, महानगरपालिकेची नवीन स्वच्छता नियमावली, २०२५ लागू झाली असली तरी मूलभूत सुविधांचा तुटवडा असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सन २०२३ मध्ये ६,६७६ सामुदायिक शौचालयाची पाहणी केली असता त्यापैकी ७ टक्के म्हणजेच ४,०१० ठिकाणी वीज उपलब्ध नसणे, ४,५१८ ठिकाणी पाणीपुरवठ्याची व्यवस्था नसणे, तसेच निकृष्ट दर्जाच्या बांधकामामुळे अपूर्ण स्थितीतील व स्वच्छता नसलेली हजारो शौचालये निदर्शनास आली आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सन २०२५-२६ या आर्थिक वर्षांसाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेने रुपये ७४,३६६.७६ कोटी एवढ्या रकमेचा अर्थसंकल्प सादर करुनही झोपडपट्टी भागात व अन्य ठिकाणी सामुदायिक शौचालयाची दुरवस्था झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, बृहन्मुंबई महानगरपालिकेने शौचालय बांधणीवर जोर दिला, परंतु नवीन शौचालय बांधल्यानंतर देखभाल दुरुस्तीकडे बृहन्मुंबई महानगरपालिकेचे दुर्लक्ष होत असून शौचालयांच्या बांधकामाची गुणवत्ता सुधारणे आणि दुरुस्ती याच्या पुनर्रचनेसाठी विस्तारित धोरण आखून महानगरपालिका क्षेत्रातील नागरिकांना आवश्यक व योग्य पद्धतीने शौचालयाची व्यवस्था करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.

स्वच्छ भारत अभियानातील निकषानुसार पुरुषांसाठी ४०० व्यक्तीपर्यंत प्रत्येकी १०० व्यक्तींसाठी १ व ४०० व्यक्तींच्या पुढे प्रत्येकी २५० व्यक्तींसाठी १ आणि महिलांसाठी २०० व्यक्तीपर्यंत प्रत्येकी १०० व्यक्तीसाठी २ व २०० व्यक्तींच्या पुढे प्रत्येकी १०० व्यक्तींसाठी १ असे निकष आहेत.

मुंबई महानगरपालिका क्षेत्रात, बृहन्मुंबई महानगरपालिका स्तरावर ३१४०, म्हाडा स्तरावर ३८३०, सीएसआर स्तरावर २८, पे ॲण्ड युज व इतर स्तरावर ११९० अशी एकूण ८,१८८ बांधलेले शौचालये असून त्यामध्ये एकूण १,००,८०० इतके शौचकूप आहेत.

(२) हे खरे नाही.

वर नमूद केल्याप्रमाणे उपलब्ध असलेली शौचालय व शौचकुपांची संख्या पुरेशी आहे. वस्ती स्वच्छता कार्यक्रमाअंतर्गत सन ऑक्टोबर, २०२६ पर्यंत २४३ नवीन शौचालयाचे व ५००० नवीन शौचकुपे यांची वाढ होणार आहे. नवीन स्वच्छता नियमावलीनुसार उपलब्ध असलेली शौचालयांची संख्या पुरेशी आहे.

(३) एकूण ८,१८८ शौचालयांपैकी २३२४ शौचालयांना विद्युत जोडणी व २२४७ शौचालयांना पाणी जोडणी आहे. तसेच ४,३०९ शौचालयांच्या देखभालीसाठी वस्ती पातळीवरील संस्था (CBO) बनविण्याची प्रक्रिया सुरु आहे. तसेच या संस्था तयार झाल्यावर शौचालयांमध्ये पाणी व विद्युत पुरवठ्याची प्रक्रिया सुरु होईल.

(४) बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत ५९४ ठिकाणी सामुदायिक शौचालये बांधण्याकरीता आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये रुपये १०० कोटी इतक्या निधीची तरतूद करण्यात आली आहे. सद्य:स्थितीत बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत एकूण २४३ शौचालयांचे काम हाती घेण्यात आले असून १२३ शौचालयांची कामे पूर्ण झालेली आहेत व १२० शौचालयांची कामे प्रगतीपथावर आहेत.

(५) मुंबई महानगरपालिका वस्ती कार्यक्रमांतर्गत जुने शौचालयांचे निष्कासन करुन आर.सी.सी. पद्धतीने पुनर्बांधकाम करण्यात येते.

सदर शौचालयाच्या दैनंदिन देखभालीसाठी स्थानिक वस्ती पातळीवरील संस्थेची स्थापना करुन त्यास शौचालय पाणी व वीज जोडणीसहित हस्तांतरित करण्यात येते. शौचालयाची दैनंदिन देखभाल व किरकोळ दुरुस्ती संस्थेमार्फत करण्यात येते व इतर दुरुस्तीची कामे संबंधित विभाग कार्यालयामार्फत करण्यात येतात.

विभाग स्तरावर वस्ती पातळीवरील संस्था यांच्या बैठका घेऊन त्यांना शौचालय स्वच्छतेबाबत मार्गदर्शन जनजागृती केली जात आहे. प्रत्येक विभाग स्तरावर २५ विभागात सामुदायिक शौचालयांचे पर्यवेक्षण करण्यासाठी २९ कंत्राटी समाज विकास अधिकाऱ्याची नेमणूक करण्यात आली आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## शिवशाही पुनर्वसन प्रकल्प कार्यालयासाठी स्वतंत्र इमारत उभारण्याबाबत

**(३८)** * **७५२८ श्री.सचिन अहिर, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील म्हाडा भवनाच्या पाचव्या मजल्यावर असलेल्या ७५० चौरस फूट क्षेत्रफळाच्या जागेत शिवशाही पुनर्वसन प्रकल्प कार्यालयाच्या कामकाजासाठी शासनाने उपलब्ध करुन दिलेल्या जागेचे म्हाडा प्राधिकरण हे रुपये १५० प्रति चौरस फूट या दराने शिवशाही कार्यालयाकडून भाडे घेत असल्याची बाब दिनांक २९ डिसेंबर, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, झोपडपट्ट्यांच्या पुनर्विकासासाठी शिवशाही पुनर्वसन प्रकल्प कार्यालयाची शासनाने निर्मिती केली असून शिवशाही पुनर्वसन प्रकल्पांचे मुंबईत स्वतःचे कार्यालय नसल्यामुळे कर्मचारी व अधिकारी यांना कामकाज करताना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुंबईतील झोपडपट्ट्यांचा विकास करणे आणि बेघर लोकांसाठी घरे उपलब्ध करून मोफत घरे बांधून देण्याचे उद्दिष्ट ठेवणाऱ्या शिवशाही पुनर्वसन प्रकल्प कार्यालयासाठी स्वत:ची स्वतंत्र इमारत उभारण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) बांद्रा, मुंबई येथील म्हाडाच्या इमारतीमध्ये शिवशाही पुनर्वसन प्रकल्प मर्यादित यांचे ७८६३ चौरस फूट क्षेत्रफळाचे कार्यालय आहे. सदर कार्यालयाचे भाडे रुपये १५ प्रतिचौरस फूट इतके होते. सदर भाडे रुपये २६५ प्रतिचौरस फूट दराने अदा करण्याबाबत म्हाडा प्राधिकरणाने शिवशाही पुनर्वसन प्रकल्प मर्यादित यांना कळविले आहे.
(२) व (३) शिवशाही पुनर्वसन प्रकल्प मर्यादित यांची कार्यालयासाठी स्वतंत्र इमारतीची कोणतीही मागणी नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## साक्री-शिर्डी (ता.सटाणा, जि.नाशिक) राष्ट्रीय महामार्गाचे काँक्रीटीकरणाचे काम पूर्ण करण्याबाबत

**(३९)** * **६६९४ श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) साक्री-शिर्डी राष्ट्रीय महामार्गाचे (NH-७५३G) (ता.सटाणा, जि.नाशिक) काँक्रीटीकरणाचे काम गत दोन वर्षांपासून प्रलंबित असून, महामार्गावरील वाढत्या अतिक्रमणांमुळे व प्रशासकीय दिरंगाईमुळे नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागत असल्याची बाब माहे डिसेंबर, २०२५ मध्ये निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महामार्गाचे काम बंद असल्यामुळे शहरात प्रचंड धूळ व प्रदूषण वाढले असून त्यामुळे नागरिकांना श्वसनाचे विकार, डोळयांची ॲलर्जी व त्वचारोगाच्या समस्या निर्माण झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर महामार्ग अरुंद व खड्डेमय झाल्याने सटाणा शहरातील हा मार्ग जीवघेणा ठरत असून, सदर मार्गावरून वेगाने येणारा ट्रक रस्त्याकडेला असलेल्या दुकानात शिरून मोठे नुकसान झाल्याची बाब माहे डिसेंबर, २०२५ मध्ये वा त्यासुमारास घडली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, महामार्गाच्या मध्यभागापासून १८ मीटर मार्ग मोकळा करण्याचा ठराव मंजूर असूनही त्याबाबत प्रत्यक्ष अंमलबजावणी होत नसल्याने व नियोजित वेळेत काम पूर्ण न झाल्याने प्रशासनाकडून नियमांचे उल्लंघन होत आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, साक्री-शिर्डी राष्ट्रीय महामार्गाचे कॉक्रीटीकरणाचे काम तातडीने पूर्ण करण्याबाबत तसेच सदर महामार्गावरील अपघात रोखण्यासाठी कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले :** (१) हे अंशतः खरे आहे.

मनमाड-येवला-कोपरगाव-शिर्डी हा महामार्ग राष्ट्रीय महामार्ग क्र. ७५२ जी असा वर्गीकृत असून सदर महामार्गाची प्रश्नाधीन लांबी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या राष्ट्रीय महामार्ग विभागाच्या अखत्यारीत आहे. रा.म. क्र. ७५२ जी वरील सटाणा ते मंगरूळ (कि.मी. ६४/०० ते कि.मी.१०१/ १४०) या लांबीतील ३७.१४० कि.मी. लांबी मधील रुंदीकरण व मजबुतीकरणाचे काम प्रगतीत आहे. यापैकी

सटाणा तालुक्यातील कि.मी. ६४/०० ते कि.मी. ७४/७२० या १०.७२० कि.मी. लांबीपैकी ८.४२ कि.मी. लांबीतील कॉंक्रीटीकरणाचे काम पूर्ण झाले आहे.

सटाणा गावातील कि.मी. ६५/७८० ते कि.मी. ६६/९२० या १.१२ कि.मी. लांबीमध्ये अस्तित्वातील रस्त्याखाली पिण्याच्या पाण्याची पाईपलाईन असून सदर पाईपलाईन्स स्थलांतरित करण्यास सद्य:स्थितीत आवश्यक जागा उपलब्ध नाही. सद्य:स्थितीत अस्तित्वात असलेल्या रस्त्याच्या गटारामधून सांडपाण्याची व्यवस्था कार्यान्वित आहे. सदर लांबीतील सांडपाण्याची विल्हेवाट लावण्यासाठी सटाणा नगरपालिकेमार्फत काम प्रस्तावित आहे. सांडपाण्याचे काम सटाणा नगरपालिकेकडून पूर्ण झाल्यानंतर अस्तित्वातील गटारी तोडून वाढीव रुंदीमध्ये कॉंक्रीटीकरणाचे काम करण्याचे नियोजन आहे.

(२) हे अंशतः खरे आहे.

धुळीचे प्रदूषण रोखण्यासाठी कंत्राटदाराकडून आवश्यक उपाययोजना करण्यात येत आहे.

(३) हे खरे नाही.

(४) हे खरे नाही.

(५) व (६) सटाणा नगर परिषदेमार्फत रुंदीकरणासाठी आवश्यक जागा उपलब्ध झाल्यानंतर वाढीव रूंदीमध्ये कॉंक्रिटीकरणाचे काम करण्याचे नियोजन आहे. तोपर्यंत कंत्राटदारामार्फत सदर लांबी वाहतुकीच्यादृष्टीने सुस्थितीत ठेवण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

-----------------

## मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या भाडेतत्वावरील गृहप्रकल्पातील गिरणी कामगारांसाठीच्या राखीव घरांच्या सोडती प्रलंबित असल्याबाबत

**(४०) * ७९४५ श्री.पंकज भुजबळ, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत : तारांकित प्रश्न क्रमांक १६७ ला दिनांक ४ मार्च, २०२५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या भाडेतत्वावरील गृहप्रकल्पातील गिरणी कामगारांसाठी राखीव असलेल्या ठाणे येथील १,२४४ (रायचूर) रायगड येथील १,०१९ व (सावो व्हिलेज) कोल्हे येथील २५८ अशा एकूण २,५२१ घरांचा समावेश असलेली सोडत प्रलंबित असून गिरणी कामगारांना अद्याप सदनिका देण्यात आल्या नाहीत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामधील रांजनोळी येथील १,२४४ घरे नादुरुस्त असून अतिशय खराब स्थितीत असल्यामुळे गिरणी कामगारांनी ही घरे दुरुस्तीनंतरच ताब्यात घेण्याची भूमिका घेतलेली असून सदर सदनिकांच्या दुरुस्तीचे काम मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाद्वारे (एमएमआरडीए) करुन सदर सदनिकांच्या दुरुस्तीचे काम पूर्ण झाल्यानंतर सदर सदनिकांची सोडत म्हाडा प्राधिकरणामार्फत काढण्याचे प्रस्तावित असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय, त्यानुषंगाने कोणती कार्यवाही करण्यात आली आहे,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन गिरणी कामगारांना त्यांच्या हक्काची घरे तात्काळ योग्य स्थितीत उपलब्ध करुन देण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) मुंबई महानगर प्रदेश प्राधिकरणाने रांजनोली, ठाणे येथील १,२४४ घरे दुरुस्त केली आहेत. सदर घरे म्हाडाकडे हस्तांतरीत करण्याची कार्यवाही मुंबई महानगर प्रदेश प्राधिकरण यांच्याकडून नियोजित आहे. रायचूर, रायगड येथील १,०१९ घरांपैकी दोन इमारतीमधील ५०० घरांची दुरुस्ती झाली आहे. उर्वरीत घरांची दुरुस्ती करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## तळेगाव (ता.दिंडोरी, जि.नाशिक) येथील प्रतिबंधित सुगंधी तंबाखूच्या कारखान्यांवर कारवाई करण्याबाबत

**(४१) * ७९९० श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तळेगाव (ता.दिंडोरी, जि.नाशिक) येथील एका कंपनीत अन्न व औषध प्रशासनाने (FDA) छापा टाकून सुमारे रुपये ९ कोटी ६ लाख २५ हजार रुपयांचा प्रतिबंधित गुटखा आणि सुगंधी तंबाखूचा साठा जप्त केला असल्याचे दिनांक ११ जानेवारी, २०२६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, इतक्या मोठ्या प्रमाणावर प्रतिबंधित पदार्थांचे उत्पादन पोलिसांच्या माहितीशिवाय सुरु असल्याची बाब निदर्शनास आली असून गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेता याची एसआयटी मार्फत चौकशी करण्याची मागणी होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, तळेगाव (ता.दिंडोरी, जि.नाशिक) येथे अवैधरित्या सुरू असलेल्या गुटखा कारखान्यात राज्यात बंदी असलेला सुगंधित तंबाखू, पानमसाला, गुटखा, जर्दा, सिगारेट्स आणि तत्सम पदार्थांचे बिनधास्तपणे उत्पादन सुरू असून मानवी आरोग्यास घातक असलेल्या या पदार्थांची निर्मिती करणाऱ्या कंपनी संचालकांवर तसेच सदर प्रकरणी दुर्लक्ष करणाऱ्या अन्न व औषध प्रशासन विभागातील संबंधित दोषी अधिकारी व कर्मचाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.नरहरी झिरवाळ :** (१) हे खरे आहे.

दिनांक ०८/०१/२०२६ रोजी अन्न व औषध प्रशासनाकडून मे.इलाईटक्रॉन इंटरनॅशनल लिमिटेड, गट नं. ३५२/२, मौजे तळेगाव, दिंडोरी, नाशिक या सिगारेट उत्पादक कंपनीची तपासणी करुन सदर कंपनीतून एकूण रुपये ९,०६,२५,४२५/- किंमतीचा प्रतिबंधित सुगंधी तंबाखूचा साठा जप्त करण्यात आला आहे.

(२) एसआयटी मार्फत चौकशी करावी अशी मागणी झाल्याची बाब अन्न व औषध प्रशासनाच्या निदर्शनास आलेली नाही.

(३) मे. इलाईटक्रॉन इंटरनॅशनल लिमिटेड, गट नं. ३५२/२, मौजे तळेगाव, दिंडोरी, नाशिक या पेढीत उपस्थित रितीक चौधरी व कंपनीचे संचालक १. विपिन शर्मा २. अंजली बम्बोरिया ३. ॲडवर्ट मिचेल बॉरगोईन ४. सुसंता कुमार पांडा ५. व्यंकट रमेश पेनुमाका ६. दयानंद रे तसेच ७. आस्थापना मे.इलाईटक्रॉन इंटरनॅशनल लिमिटेड, गट नं. ३५२/२, मौजे तळेगाव, दिंडोरी, नाशिक यांच्याविरूद्ध दिंडोरी पोलीस स्टेशन मध्ये भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम १२३, २२३, २७४, २७५ तसेच अन्न सुरक्षा मानके कायदा २००६ चे विविध कलमांतर्गत प्रथम खबर अहवाल क्र. ०९/२०२६ दाखल केला आहे. सदर प्रकरणी पुढील तपास स्थानिक गुन्हे शाखा, नाशिक ग्रामीण यांच्यामार्फत करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबई ते पुणे द्रुतगती महामार्गावरील मिसिंग लिंक प्रकल्प अपूर्णावस्थेत असल्याबाबत

**(४२) * ८३३५ श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, श्री.जयंत आसगावकर, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, श्री.शशिकांत शिंदे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई ते पुणे द्रुतगती या महामार्गावर खोपोली ते कुसगाव ही १९.८० कि.मी. ची नवीन मार्गिका मिसिंग लिंकचे काम सन २०१९ मध्ये वा त्यादरम्यान राज्य रस्ते विकास महामंडळाने हाती घेतले असून हा प्रकल्प मूळ उद्दिष्टानुसार सन २०२२ मध्ये पूर्ण होणे अपेक्षित होते परंतु अद्यापही सदर प्रकल्प अूपर्णावस्थेतच असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मुंबई ते पुणे प्रवास अधिक जलद आणि सुरक्षित करण्यासाठी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने हाती घेतलेल्या मिसिंग लिंक प्रकल्पाच्या खर्चात दहा टक्क्यांनी वाढ होवून सदर प्रकल्पाचे काम प्रलंबित रहाण्याची कारणे काय आहेत, सदर वाढीव खर्चाची तरतूद करण्यात आली आहे काय,
(३) असल्यास, मुंबई आणि पुणे या दोन महत्त्वाच्या शहरांना जोडणाऱ्या एक्स्प्रेसवेवर गेल्या काही दिवसात प्रवाशांना नाहक त्रासाला सामोरे जावे लागत असून सुमारे ३६ तास चाललेल्या भीषण वाहतूक कोंडीमुळे प्रवाशांचे प्रचंड हाल झाले असून घाटातील अरुंद आणि अपघाती वळणांमुळे वारंवार होणारी वाहतूक कोंडी टाळण्यासाठी महत्त्वाचा असलेला मिसिंग लिंक प्रकल्प पूर्णत्वास लागणारा वेळ सातत्याने वाढत असल्याने नागरिकांमध्ये संतापाची भावना व्यक्त होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर कामास विलंब झाल्याने सुधारित खर्चात रुपये ६८५० कोटी वरून रुपये ७५०० कोटी एवढी वाढ झाली असून, याबाबत शासनाने माहिती घेऊन या कामास विलंब करणाऱ्या अधिकारी व कर्मचारी यांच्यावरील जबाबदारी निश्चित करून त्यांच्यावर कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) असल्यास, मुंबई-पुणे एक्स्प्रेसवेवरील वाहतूक कोंडीची दखल घेऊन आपत्कालीन परिस्थितीतील वाहतूक आराखडा तात्काळ तयार करण्याच्या सूचना देऊन सोबतच मिसिंग लिंकचे कामही लवकर पूर्ण करण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केल्या आहेत वा करण्यात येत आहेत,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे आहे.

(२) प्रकल्पाच्या खर्चातील वाढ प्रशासकीय मान्यता रकमेच्या दहा टक्क्याच्या मर्यादेत आहे. सदरहू प्रकल्पाच्या कामात विविध तांत्रिक व भौगोलिक अडचणींमुळे कामाच्या मुदतीत वाढ झालेली आहे.

(३) हे अंशत: खरे आहे.

मिसिंग लिंक प्रकल्प पूर्ण करताना उद्भवलेल्या विविध तांत्रिक व भौगोलिक अडचणीमुळे मुदतीत वाढ झाली आहे. तथापि, सद्य:स्थितीत ९७.७ टक्के काम पूर्ण झाले असून माहे मे, २०२६ पासून मिसिंग लिंक मार्ग वाहतुकीस खुला करण्याचे नियोजन आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर झालेल्या वाहतूक कोंडीची दखल घेऊन त्याबाबत अभ्यास करणे तसेच भविष्यात अशी परिस्थिती उद्भवल्यास आवश्यक आपत्कालीन तातडीच्या उपाययोजना करणे तसेच अशा परिस्थितीतील वाहतुकीचे नियोजन व प्रवाशांसाठी आपत्कालीन निर्गमन बाबतची कार्यप्रणाली तयार करण्यासाठी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडून भारतीय रस्ते महासभा (IRC) चे माजी अध्यक्ष श्री.सी. पी. जोशी यांचे अध्यक्षतेखाली सात सदस्यीय समिती नेमण्यात आली आहे. सदर समितीच्या अहवालानुसार पुढील आवश्यक उपाययोजना करण्यात येतील.

तसेच मिसिंग लिंक मार्ग माहे मे, २०२६ पासून वाहतुकीस खुला करण्याचे नियोजन असून सदर मार्गामुळे भविष्यात या द्रुतगती मार्गावरील वाहतूक कोंडी व अपघातांमध्ये लक्षणीय घट होणार आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नवी मुंबईतील वाहतूक कोंडीची समस्या सोडविण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत

**(४३) * ६८८० श्री.प्रसाद लाड, श्री.प्रविण दरेकर, श्रीमती उमा खापरे, श्रीमती चित्रा वाघ, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत, श्री.विक्रांत पाटील, श्री.संजय केणेकर, श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबई शहराचा विस्तार, वाढते उद्योगधंदे, रोजगाराच्या संधी आणि पायाभूत प्रकल्पामुळे लोकसंख्या आणि वाहनसंख्या वाढत असताना पायाभूत सुविधांमध्ये वाढ झाली नसून खाजगी वाहने, व्यावसायिक वाहने आणि मालवाहतूक यामुळे प्रमुख रस्ते तसेच वसाहतीतील अंतर्गत रस्तेही अपुरे पडत असून पुर्वनियोजनाअभावी अनेक ठिकाणी रस्त्यांच्या दुतर्फा वाहने उभी करण्यात येत असल्याने वाहतूक कोंडीची समस्या उद्‌भवत असल्याची बाब माहे डिसेंबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महानगरपालिकेचे तत्कालीन आयुक्त यांनी संपूर्ण शहराचा दौरा करुन पार्किंग व्यवस्थेचा आढावा घेत शहरातील विविध नोड्समध्ये भूमिगत तसेच बहुमजली वाहनतळ उभारण्याचा प्रस्ताव तयार केला होता व काही ठिकाणी जागांचीही पाहणी झाली परंतु सदर प्रस्तावाची अंमलबजावणी झाली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुंबई महानगर प्रदेशातील नवी मुंबई शहरात वाढते उद्योगधंदे, रोजगाराच्या संधी आणि पायाभूत प्रकल्पांमुळे लोकसंख्या आणि वाहनसंख्या यात दिवसेंदिवस वाढ होत असताना पायाभूत सुविधा मात्र तेवढ्याच राहिल्या असल्याची बाब दिनांक ११ जानेवारी, २०२६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, नवी मुंबई महानगरपालिकेचे तत्कालीन आयुक्त यांनी संपूर्ण शहराचा दौरा करुन पार्किंग व्यवस्थेचा आढावा घेऊन शहरातील विविध नोड्समध्ये भूमिगत तसेच बहुमजली वाहनतळ उभारण्याचा प्रस्ताव तयार करण्यात येऊनही सदरहू प्रस्तावाची अंमलबजावणी अद्यापही करण्यात आलेली नसून नवी मुंबईचा वाढत्या विस्ताराच्यादृष्टीने शहरातील वाहनतळासह (पार्किंग) वाहतूक कोंडीच्या दीर्घकालीन समस्या सोडविण्याच्यादृष्टीने शहराकरीता पार्किंग धोरण निश्चित करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१), (२) व (३) हे खरे नाही.

नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रात एकूण १४ पार्किंगचे भूखंड सिडकोकडून महानगरपालिकेला हस्तांतरित केले असून त्यापैकी भूखंड क्र.३५, सेक्टर -१५, बेलापूर, नवी मुंबई या ठिकाणी बहुमजली पार्किंग (Multi-storeyed Parking) जी + ४ इमारत बांधली असून, सदर इमारतीत पे ॲण्ड पार्क सुरु करण्यात आलेली आहे व हस्तांतरित भूखंडापैकी एकूण ०२ भूखंडावर पे ॲण्ड पार्क सुरु असून, उर्वरित भूखंडांची निविदा प्रक्रिया सुरु आहे.

तसेच, ४२ ठिकाणांपैकी २५ ठिकाणी पोलीस उप आयुक्त (वाहतूक), नवी मुंबई यांच्या वाहतूक नियंत्रण अधिसूचना २०१६ च्या अधिसूचनेनुसार रस्त्यावर समांतर पार्किंग, तसेच सम विषम पार्किंग सुरु आहे व १७ ठिकाणांची निविदा प्रक्रिया सुरु आहे. उक्त पे ॲण्ड पार्कचे दर महानगरपालिका ठराव क्र.७३८९, दिनांक १२/०३/२०२५ नुसार निश्चित करण्यात आलेले आहेत व टॅक्सी व रिक्शा पार्किंगसाठी ४३ भूखंड सिडकोने महानगरपालिकेस हस्तांतरित केलेले असून त्यांचा वापर सुरु आहे.
(४) नवी मुंबईचा वाढत्या विस्ताराच्यादृष्टीने शहरातील वाहनतळासह (पार्किंग) वाहतूक कोंडीच्या दीर्घकालीन समस्येचे निराकरण होण्याच्यादृष्टीने उपरोक्तप्रमाणे कार्यवाही सुरू आहे. तसेच, सिडकोच्या ताब्यातील १०७ आरक्षित भुखंडापैकी गरजेचे भूखंड महानगरपालिकेकडे पार्किंग सोईकरीता हस्तांतरीत करण्याबाबत नवी मुंबई महानगरपालिकेकडून पत्रव्यवहार सुरू आहे. तसेच, मे. सक्षम फॅसिलिटी सर्विसेस प्रा.लि. यांचेकडून '१०० ट्राफिक वॉर्डन' पोलीस उप आयुक्त (वाहतूक), नवी मुंबई यांना उपलब्ध करून देण्यासाठी दिनांक ३०/०१/२०२६ रोजी कार्यादेश देण्यात आलेले आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात विशेषत: पुणे शहर व परिसरात बनावट पनीर व चीझ ॲनालॉगची विक्री होत असल्याबाबत

**(४४) * ७३१९ श्री.श्रीकांत भारतीय, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विशेषत: पुणे शहर व परिसरात बनावट पनीर व चीझ ॲनालॉगची मोठ्या प्रमाणावर विक्री होत असून पुणे अन्न व औषध प्रशासन विभागाने केलेल्या कारवाईत अंदाजे ७५० किलो बनावट पनीर व चीझ ॲनालॉग जप्त करण्यात आल्याची बाब माहे ऑगस्ट, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बनावट पनीर तयार करणारे कारखाने, वितरक, घाऊक विक्रेते व किरकोळ विक्रेते यांची तसेच संबंधित उत्पादन युनिट्सची अन्न व औषध प्रशासन विभागाने नियमित तपासणी करण्यासाठी शासनामार्फत एक विशेष पथक स्थापन करण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मुंबईतील ॲन्टॉप हिल परिसरातील काही दुग्धालयात चीझ ॲनालॉग पदार्थांची पनीर म्हणून विक्री केली जात असताना एका टेम्पोमधून सुमारे ५५० किलो निकृष्ट दर्जाचे पनीर जप्त केल्याची बाब माहे ऑगस्ट, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, भारतीय अन्न सुरक्षा आणि मानके प्राधिकरण (एफएसएसआयच्या) च्या नियमांनुसार, अन्नपदार्थांची सुरक्षा, गुणवत्ता आणि स्वच्छता सुनिश्चित करण्यासाठी नियम असून जर उत्पादनात खरे चीझ नसल्यास विक्रीच्या ठिकाणी चीझ ॲनालॉग असे लेबल लावणे बंधनकारक आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, चीझ ॲनालॉग हे दुधाऐवजी दुधाची पावडर, हलक्या प्रतीचे पामतेल व केमिकल्सच्या मिश्रणातून तयार केले जात असून अशा निकृष्ट व बनावट पनीरची विक्री करणाऱ्या व्यापाऱ्यांवर शासकीय यंत्रणांकडून मोक्का अंतर्गत कारवाई करुन तात्काळ परवाना रद्द करण्याचे आदेश, गुन्हे दाखल करणे, दंडात्मक कारवाई, उत्पादन सील करणे इ. प्रकारची कारवाई अन्न व औषध प्रशासन विभागामार्फत करण्यात येऊन राज्यात विशेषत: पुणे शहर व परिसरात बनावट पनीर व चीझ ॲनालॉगची मोठ्या प्रमाणावर होणाऱ्या विक्रीवर निर्बंध आणण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.नरहरी झिरवाळ :** (१) अंशत: खरे आहे.

अन्न व औषध प्रशासनाने पुणे शहरात दिनांक २५/०९/२०२५ रोजी मे.श्रीनाथ ट्रान्सपोर्ट, लक्ष्मी नगर, पर्वती यांचे वाहन क्रमांक MH १२ VF ६०७० बुधवार पेठ, पुणे या ठिकाणी सखोल तपासणी करुन लुज पनीर या अन्नपदार्थाचे एकूण १३ नमुने घेवुन उर्वरित लुज पनीरचा साठा एकूण ९५४७ किलो किंमत रुपये २२९१२८०/- जप्त केला आहे. विश्लेषणासाठी घेण्यात आलेले १३ नमुन्यापैकी ०१ अन्ननमुना हा प्रमाणित, ११ अन्ननमुने हे कमी दर्जा, ०१ अन्न नमुना हा असुरक्षित घोषित करण्यात आला आहे. ११ कमीदर्जा नमुन्यांप्रकरणी न्यायनिर्णय अर्ज तसेच, ०१ असुरक्षित नमुन्याप्रकरणी न्यायनिर्णय खटला दाखल करण्यात येत आहे.
(२) हे खरे नाही.

तथापि, अन्न व औषधप्रशासनातील सर्व अन्न सुरक्षा अधिकारी यांना बनावट पनीरबाबत नियमित तपासणी करण्याबाबत निर्देश देण्यात आले आहेत.

(३) दिनांक २५ ऑगस्ट, २०२५ रोजी मुंबईतील अँटॉपहिल या परिसरात मे.कौशल्या डेअरी फूड, सुभाष नगर, दिघा, नवी मुंबई या आस्थापनेचे वाहन क्र.MH०५- FJ ०६५० तसेच, मे.ओम कोल्ड ड्रिंक हाउस, जी.टी.बी. नगर, सायन कोळीवाडा, अँटॉप हिल, मुंबई या आस्थापानंमधून Cheese analogue या अन्न पदार्थाचे दोन नमुने विश्लेषणासाठी घेण्यात आले होते. सदर अन्न पदार्थाच्या वेष्टनावर कोणतेही लेबल/मजकूर आढळून आले नाही. Cheese analogue हे नाशवंत असल्याने व त्याचा पनीर म्हणून वापर होऊ नये या उद्देशाने सदर Cheese analogue चा उर्वरित साठा (वजन २१८ किलो, किंमत रुपये ५४६२५/-) जप्त करून तत्काळ नष्ट करण्यात आला होता.उपरोक्त नमूद दोन्ही अन्न नमुने हे मानकानुसार असल्याने अन्न विश्लेषक, अन्न व औषध प्रशासन प्रयोगशाळा, मुंबई यांनी प्रमाणित घोषित केले आहेत. विनालेबल cheese analogue चे उत्पादन, साठवणूक, वाहतूक, विक्री प्रकरणी संबंधित आस्थापनांविरुद्ध न्यायनिर्णय खटले दाखल करण्यात आले आहेत.

तसेच, मे.श्री.गणेश डेअरी, जी.टी.बी.नगर, सायन कोळीवाडा, अँटॉप हिल, मुंबई या आस्थापनेची तपासणी करून १) Medium fat paneer २) Cheese analogue या अन्नपदार्थांचे नमुने विश्लेषणासाठी घेण्यात आले होते. उपरोक्त दोन्ही अन्न नमुने हे प्रमाणित असल्याचे अन्नविश्लेषक, अन्न व औषध प्रशासन प्रयोगशाळा, मुंबई यांनी त्यांच्या दिनांक १३/०९/२०२५ रोजीच्या अहवालानुसार घोषित केले आहे.

(४) हे खरे आहे.

'चीज ॲनालॉग' या अन्न पदार्थाच्या वेष्टनावर घटक पदार्थ तसेच, सदर पदार्थ खरे चीज नसून ॲनालॉग असल्यास चीज ॲनालॉग असे नमूद करणे आवश्यक आहे. कोणत्याही अन्न पदार्थाच्या वेष्टनावर त्या अन्नपदार्थाचे नाव असणे बंधनकारक आहे. 'ॲनालॉग' या अन्नपदार्थाच्या व्याख्येनुसार ॲनालॉग बनवताना दुधापासून नसलेला एखादा घटक पदार्थ अंशतः अथवा पूर्णतः दुधाच्या घटकाची जागा घेतो व तयार होणारा अंतिम पदार्थ दुग्धजन्य पदार्थ सारखा भासतो.

(५) विभागाकडून दूध व पनीर मध्ये भेसळ करणाऱ्यांवर The Maharashtra Control of Organised Crime Act, १९९९ (MCOCA) अंतर्गत कारवाई करने कायदेशीरदृष्ट्या शक्य आहे किंवा कसे, याबाबत विधी व न्याय विभागाचे अभिप्राय घेण्यात आले आहेत. त्यानुसार, मकोका हा एक कठोर फौजदारी कायदा असल्यामुळे त्याच्या वर्तमान व्याप्तीचा उपयोग अशा दूध भेसळ करणाऱ्यांवर खटला चालवण्यासाठी होऊ शकत नसल्याने अशा प्रकारच्या गुन्ह्यांना कठोर शिक्षा देण्यासाठी त्याचा समावेश स्वतंत्र कायद्यात करणे, किंवा विद्यमान कायद्यात दुरुस्ती करणे आवश्यक असल्याचे अभिप्राय विधी व न्याय विभागाने दिले आहे. त्यानुसार पुढील आवश्यक कार्यवाही करण्यात येत आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पणन मंडळ व आदिवासी विकास महामंडळाच्या माध्यमातुन धान खरेदी केलेल्या शेतकऱ्यांच्या चुकाऱ्यांची थकीत रक्कम अदा करण्याबाबत

**(४५) * ८३६२ श्री.अभिजित वंजारी :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने पणन मंडळ व आदिवासी विकास महामंडळाच्या माध्यमातुन २,१५,२२६ शेतकऱ्यांकडून धानाच्या किमान आधारभूत किंमती (एम.एस. पी.) अंतर्गत प्रती क्विंटल रुपये २३६९/ दराने ७,३०,१०९ टन धान खरेदी केले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यानुसार शासनाकडे चुकाऱ्यांचे रुपये १७२९ कोटी, ६२ लाख, ९८ हजार, २२६/- (रुपये १७२९, ६२,९८,२२६/-) एवढी रक्कम थकीत असल्यामुळे शेतकरी आर्थिक अडचणी निर्माण झाल्या असून पुढील हंगामाच्या तयारीवर याचा परिणाम होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, पणन मंडळ व आदिवासी विकास महामंडळाच्या माध्यमातुन धान उत्पादक शेतकऱ्यांना चुकाऱ्यांची थकीत रक्कम तात्काळ मिळण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.छगन भुजबळ :** (१) हे खरे आहे.

दिनांक २५ फेब्रुवारी, २०२६ अखेर २,८३,७७० शेतकऱ्यांकडून ८,९०,५७३ मेट्रिक टन धान खरेदी करण्यात आला आहे.
(२) व (३) दिनांक २५ फेब्रुवारी, २०२६ अखेर १,३८,६२२ शेतकऱ्यांना रुपये ११२०.९४ कोटी चुकारे अदा करण्यात आले आहे. उर्वरित शेतकऱ्यांचे चुकारे अदा करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## गोंदिया जिल्ह्यातील मद्य तस्करी रोखण्याबाबत

**(४६) * ६६४९ डॉ.परिणय फुके, श्रीमती उमा खापरे, श्री.सदाशिव खोत, श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बाम्हणी (ता.आमगाव, जि.गोंदिया) रेल्वे फाटकाजवळ राज्य उत्पादन शुल्क विभागाने मध्य प्रदेशातून होणारी रुपये ११ लाख ३२ हजार १०८ एवढ्या रकमेची विदेशी मद्याची अवैध तस्करी रोखून मुद्देमाल जप्त केल्याची घटना दिनांक २१ डिसेंबर, २०२५ रोजी वा त्यासुमारास घडल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गोंदिया जिल्हा मध्य प्रदेशाच्या सीमेवर असल्याने विदेशी मद्याच्या तस्करीच्या अनेक घटना गेल्या वर्षभरात वारंवार घडत असल्यामुळे शासनाच्या राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या महसुलात घट होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, आगामी सण-उत्सव आणि निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर ही तस्करी अधिक वाढण्याची शक्यता निर्माण झाली असून अवैध मद्याच्या पुरवठ्यामुळे ग्रामीण भागात कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न गंभीर झाला असून यामुळे शासकीय महसूल बुडवून गुन्हेगारी प्रवृत्तींना आळा घालण्याच्यादृष्टीने शासन करीत असलेल्या कारवाईचे स्वरुप काय आहे,

(४) असल्यास, सदर तस्करीच्या वारंवार घडणाऱ्या घटनांचा खोलवर तपास करण्याच्यादृष्टीने मध्य प्रदेश सीमेवरील तपासणी नाके (Checkposts) अधिक कडक करण्यासाठी आणि तंत्रज्ञानाचा वापर करून तस्करी कायमस्वरूपी रोखण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही व उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती सुनेत्रा पवार :** (१) होय, हे खरे आहे.

गोंदिया जिल्ह्यात मध्य प्रदेश राज्यातील मद्याची तस्करी करताना राज्य उत्पादन शुल्क विभागामार्फत दिनांक २१ डिसेंबर, २०२५ रोजी एक गुन्हा नोंद करण्यात आला आहे. यामध्ये एका आरोपीस अटक करण्यात आली असून रुपये ११,३२,१०८ किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

(२) हे खरे नाही.

(३) गोंदिया जिल्ह्यामध्ये मध्यप्रदेश व छत्तीसगड राज्यांशी संलग्न सीमाभागात विदेशी दारूच्या तस्करीबाबत उपरोक्त नमूद गुन्हा वगळता अन्य गुन्हा नोंद नाही.

अवैध दारू व्यवसायांवर कार्यकारी क्षेत्रिय घटक, भरारी पथके, सीमा तपासणी नाके यांच्यामार्फत नियमितपणे व सातत्य पूर्वक कारवाई करण्यात येते. त्यानुसार, दिनांक ०१/०४/२०२५ ते दिनांक १५/०२/२०२६ या कालावधीमध्ये महाराष्ट्र दारुबंदी अधिनियमातील तरतुदी नुसार खालीलप्रमाणे कारवाया केल्या आहेत :-एकूण गुन्हे*अटक आरोपी*जप्त मुद्देमाल किंमत रुपये कोटीमध्ये

१३२०*१०९५*२.४०

तसेच, सराईत गुन्हेगारांवर महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमाचे कलम ९३ खाली आणि एमपीडीए कायद्याखाली सक्षम प्राधिकाऱ्यांच्या मान्यतेने प्रतिबंधात्मक कारवाया करण्यात येतात. त्यानुसार, महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम, १९४९ चे कलम ९३ नुसार, प्रतिबंधात्मक कार्यवाही अंतर्गत दिनांक ०१/०४/२०२५ ते १५/०२/२०२६ पर्यंत १६७ प्रस्ताव दाखल करून रुपये ३२.२५ लक्ष बंधपत्राची रक्कम वसूल करण्यात आली आहे.

(४) आंतरराज्यीय तस्करीसह सर्व प्रकारचे अवैध दारु विषयक मद्य गुन्हे उघडकीस आणण्यासाठी गोंदिया जिल्ह्यात आंतरराज्यीय सीमावर्ती भागात देवरी येथे एक नियमित सीमा तपासणी नाका आणि घाटटेमणी व आमगाव (माल्ही) या दोन ठिकाणी तात्पुरते सीमा तपासणी नाके कार्यान्वित करण्यात आलेले आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुदखेड (जि.नांदेड) शहरातील वाहतूक कोंडीच्या समस्या सोडविण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत

**(४७) * ६७१३ श्री.हेमंत पाटील, श्री.कृपाल तुमाने :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुदखेड (ता.मुदखेड, जि.नांदेड) शहरातील अरुंद रस्ते, वाढते अतिक्रमण यामुळे रेल्वेस्थानक, रेल्वे फाटक, उमरी चौक, आंबेडकर चौक, मुख्य बाजारपेठ या मुख्य रस्त्यांवर दररोज वाहतूक कोंडी निर्माण होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वाहतूक कोंडीचा थेट परिणाम नागरिकांच्या वेळेवर, आरोग्यावर आणि कामाच्या उत्पादकतेवर होत असून रुग्णवाहिकांना मार्ग मिळण्यात अडचणी येतात, विद्यार्थी वेळेवर शाळेत पोहोचू शकत नाहीत, तर नोकरदारांना कार्यालयात पोहोचण्यास उशीर होतो तसेच वाढत्या अपघातांची भीतीही कायम असून याकडे स्थानिक नगरपरिषद प्रशासन व पोलीस प्रशासनाचे दुर्लक्ष होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने रस्ते रुंदीकरण, प्रभावी ट्रॅफिक सिग्नल व्यवस्था, स्कूलबस व रिक्षांसाठी स्वतंत्र नियोजन, फेरीवाल्यांचे नियमन आणि कालबाह्य वाहनांवर कठोर कारवाई करुन वाहतूक कोंडीच्या समस्येचे निराकरण करण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

पोलीस प्रशासन व नगरपरिषद प्रशासनाच्या संयुक्त पथकामार्फत वाहतुकीचे दैनंदिन नियोजन, तसेच अतिक्रमण निर्मूलन करण्यात येते. त्यामुळे विद्यार्थी, नोकरदार, रुग्णवाहिका यांना कोणत्याही प्रकारच्या अडचणी निर्माण होणार नाही, याची नगरपरिषदेमार्फत दक्षता घेण्यात येते.

(३) वाहतूक व्यवस्थापन करण्याच्यादृष्टीने मुदखेड नगरपरिषद हद्दीतील उमरी चौक, भोकर चौक, बारड रोड, महात्मा फुले चौक, कालेजी देवी मंदिर चौक येथे स्कूल बस व रिक्षा थांबे उभारण्यात आले आहेत.

आठवडी बाजाराच्या दिवशी शहरातील रस्त्यावर फेरीवाले फिरणार नाहीत याबाबत दक्षता घेण्यात येते. तसेच फेरीवाल्यांना नो हॉकर झोन क्षेत्रात प्रतिबंध करण्यात येतो.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अहिल्यानगर जिल्ह्यातील नगर-मनमाड महामार्गाची दुरुस्ती करण्याबाबत

**(४८) * ६६९१ श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राहुरी परिसरात नगर-मनमाड (जि.अहिल्यानगर) महामार्गाच्या अपूर्ण व निकृष्ट दर्जाच्या कामामुळे सदर महामार्गावर गत वर्षभरात झालेल्या गंभीर रस्ते अपघातात अनेक नागरिकांना आपला जीव गमवावा लागला असून, याबाबत स्थानिक नागरिकांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे तसेच अनेकदा डिजिटल फलक लावून निषेधही करण्यात आला असल्याची बाब माहे डिसेंबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर महामार्गावर ठिकठिकाणी पडलेले खोल खड्डे, उडणारी प्रचंड धूळ आणि महामार्गांची अपूर्णावस्थेतील कामे यामुळे अपघातांचे प्रमाण वाढले असून प्रवाशांना व स्थानिक नागरिकांना जीव धोक्यात घालून प्रवास करावा लागत आहे, सदर मार्गावर वारंवार होणाऱ्या अपघातांमुळे परिसरात मृत्यूच्या घटना घडत असून कंत्राटदाराचा निष्काळजीपणा आणि प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे रस्ते सुरक्षा नियमांचे उल्लंघन होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, स्थानिक नागरिकांनी या महामार्गाच्या दुरवस्थेबाबत वारंवार आंदोलने करून व निवेदने देऊनही शासनाकडून कोणतीही कृती होत नसल्याने सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान व मानवी जिवितांची हानी झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर महामार्गाची तातडीने दुरुस्ती करुन अपघात रोखण्यासाठी महामार्गांच्या कामासाठी 'कालबद्ध मर्यादा' निश्चित करून दोषी कंत्राटदार व सदर प्रकरणी दुर्लक्ष करणाऱ्या संबंधित अधिकारी/कर्मचारी यांचेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले :** (१) व (२) अहिल्यानगर-मनमाड राष्ट्रीय महामार्ग क्र. १६० या महामार्गाच्या चौपदरीकरणाचे काम भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणामार्फत प्रगतीत आहे प्रस्तुत चौपदरीकरणाच्या कामास दिनांक २९ एप्रिल, २०२५ रोजी कार्यारंभ आदेश देण्यात आलेला असून कामाची मुदत दोन वर्ष आहे.

राहुरी शहरामधील महामार्गाचे डांबरीकरण सद्य:स्थितीत प्रगतीत असून सद्य:स्थितीत शिर्डी-अहिल्यानगर महामार्गाच्या उजव्या बाजूतील डांबरीकरण पूर्ण झाले आहे.

वाहतूक सुरळीत व सुरक्षिततेच्यादृष्टीने होमगार्ड व ट्रॅफिक वॉर्डन यांचे नेमणूक करण्यात आली आहे. तसेच आवश्यक त्या ठिकाणी सुरक्षा फलक लावण्यात आले आहेत.

गृह विभागाच्या अहवालानुसार सन २०२५ मध्ये अहिल्यानगर-मनमाड महामार्गावर एकूण ८० अपघात झाल्याची नोंद आहे. तथापि, महामार्गाच्या निष्कृष्ट दर्जाच्या कामामुळे अपघात झाल्याचे नोंद नाही.
(३) गृह विभागाच्या अहवालानुसार दिनांक १० सप्टेंबर, २०२५, दिनांक १३ सप्टेंबर, २०२५ रोजी स्थानिक नागरिकांमार्फत आंदोलन करण्यात आले होते.
(४) व (५) सद्य:स्थितीत महामार्गावरील अस्तित्वातील खड्डे भरण्याचे काम ठेकेदारामार्फत प्रगतीत आहे व प्रकल्पाचे काम विहित कालावधीत व गुणवत्तापूर्वक करण्याबाबत संबंधित ठेकेदारास सूचना देण्यात आल्या आहेत.

-----------------

## राज्यात खाद्यपदार्थांच्या पाकिटांवर घटक पदार्थांची दिशाभूल करणारी माहिती दर्शविण्यात येत असल्याबाबत

**(४९)** * **७८९० श्री.पंकज भुजबळ, श्री.अमोल मिटकरी, श्री.इद्रिस नायकवडी :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बाजारात उपलब्ध असलेल्या अनेक खाद्यपदार्थांच्या पाकिटांवर 'आटा', 'फ्रेश' किंवा 'काजू' अशी नावे असली, तरी प्रत्यक्षात त्यामध्ये मैदा, पाम ऑईल, साखरेचे प्रमाण अधिक असणे किंवा काजूचे प्रमाण अत्यंत नगण्य (०.९%) असून खाद्यपदार्थांच्या पाकिटांवरील दिशाभूल करणारी माहिती, घटकद्रव्यांमधील भेसळ यामुळे नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण होत असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विशेषतः ज्येष्ठ नागरिकांसाठीच्या प्रोटीन पावडरमध्ये प्रति स्कूप ९ ग्रॅम साखरेचे प्रमाण असणे आणि स्नॅक्स व बिस्किटांमध्ये हानिकारक पाम ऑईलचा वापर होत असल्यामुळे मधुमेह, हृदयविकार व लठ्ठपणा यांसारखे आजार बळावत असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, पान मसाला आणि तत्सम पदार्थांच्या जाहिरातींमध्ये 'केसर' किंवा 'चांदी' असल्याचा दावा केला जात असला, तरी प्रत्यक्षात अशा घातक पदार्थांच्या सेवनामुळे देशात मुखाच्या कर्करोगाचे प्रमाण वाढत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, प्रत्येक खाद्यपदार्थाच्या पाकिटावर साखर आणि रसायनांची स्पष्ट लेबलिंग अनिवार्य करणे, उच्च शर्करायुक्त पदार्थांवर मोठ्या अक्षरात आरोग्य इशारा प्रसिद्ध करणे आणि खोट्या जाहिराती करणाऱ्या कंपन्यांवर 'अन्न सुरक्षा व मानके कायद्या' नुसार कारवाई करण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.नरहरी झिरवाळ :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

अन्न सुरक्षा व मानके (लेबलिंग व डिस्प्ले) नियमन, २०२० मधील तरतुदी नुसार प्रत्येक पॅकबंद अन्न पदार्थाच्या लेबलवर सदर नियमनाप्रमाणे घटक पदार्थाबाबत माहिती छापणे बंधनकारक आहे. Food Safety and Standards (advertising and Claims) regulations, २०१८, अन्न उत्पादनांबद्दल दिशाभूल करणाऱ्या जाहिराती आणि खोटे दावे प्रतिबंधित करतात. अन्न व औषध प्रशासनातील अन्न सुरक्षा अधिकारी यांचेमार्फत अशा प्रकारच्या अन्न पदार्थाचे नमुने विश्लेषणासाठी घेण्यात येतात. सदर नियमनाचे उल्लंघन झाल्यास अन्न सुरक्षा कायदयानुसार संबंधितांविरुद्ध न्यायनिर्णय प्रकरण अथवा तडजोड (Compounding) अर्ज केले जातात व त्या अनुषंगाने दंडात्मक कारवाई करण्यात येते.

राज्यात १ एप्रिल, २०२५ ते ३१ जानेवारी, २०२६ या कालावधीत अन्नपदार्थाच्या पाकिटावरील नमूद असलेले दिशाभूल करणारी माहितीच्या संदर्भात उल्लंघन केलेली अशी १६ प्रकरणे आढळून आलेली आहेत. १६ प्रकरणांपैकी ०८ प्रकरणे न्यायनिर्णयासाठी दाखल झालेली असून ४ प्रकरणात तडजोड अर्ज दाखल करण्यात आलेले आहेत. त्यामधील १ प्रकरणात रुपये १०,०००/- एवढा दंड आकारण्यात आला आहे. तसेच, ४ प्रकरणी न्यायनिर्णय अर्ज दाखल करण्यात येत आहे.
(३) हे खरे आहे.

पान मसाल्यातील घटक पदार्थाच्या सेवनामुळे मुखाचा कर्करोग होण्याची शक्यता असते, त्यामुळे अन्न व औषध प्रशासनामार्फत दिनांक १६/०७/२०२५ नुसार ०१ वर्षासाठी गुटखा, पानमसाला व तत्सम अन्न पदार्थाच्या उत्पादन, साठा, विक्री व वाहतूक करण्यात प्रतिबंध घालण्यात आला आहे.

अन्न व औषध प्रशासनामार्फत राज्यात १ एप्रिल, २०२५ ते ३१ जानेवारी, २०२६ या कालावधीत एकूण ५१७ आस्थापनांच्या तपासणी केल्या असून त्यापैकी ५०९ आस्थापनांमध्ये रुपये ७५,२९,७५,१९२/- इतक्या किमतींचा प्रतिबंधित पदार्थाचा साठा जप्त करण्यात आला आहे. सदर कालावधीत एकूण १५३ वाहने जप्त करण्यात आली असून त्यांची किंमत रुपये ९,५१,५८,०५४/- अशी आहे. तसेच, १५१ आस्थापना सील करण्यात आल्या आहेत. तसेच, ४६९ प्रकरणी प्रथम खबरी अहवाल नोंदविण्यात आले आहेत.

(४) Food Safety and Standards Act, २००६ कलम ३(१)(zf) व संबंधित तरतुदींनुसार पॅकेजिंगवरील दावा (Claim) आणि प्रत्यक्ष घटकांमध्ये विसंगती असल्यास तो Misbranded Food समजला जातो. Food Safety and Standards (advertising and Claims) regulations, २०१८, अन्न उत्पादनांबद्दल दिशाभूल करणाऱ्या जाहिराती आणि खोटे दावे प्रतिबंधित करतात. तसेच, food safety and standards (Labelling and Display) regulation, २०२० च्या तरतुदीनुसार वेळोवेळी तपासणी करण्यात येते. अन्न सुरक्षा आणि मानके कायदा, २००६ मधील कलम २४(१) हे खाद्यपदार्थाची दिशाभूल करणारी किंवा फसवणूक करणाऱ्या जाहिरातीवर प्रतिबंध घालतात तसेच, कलम ५३(१) नुसार अश्या जाहिराती करणाऱ्या वर १० लाखांपर्यंत दंड केला जातो.

अन्न व औषध प्रशासनामार्फत राज्यात ०१ एप्रिल, २०२५ ते ३१ जानेवारी, २०२६ या कालावधीत एकूण ०७ प्रकरणांमध्ये खोट्या जाहिरातीच्या अनुषंगाने कारवाई करण्यात येऊन न्यायनिर्णय अर्ज दाखल करण्यात आले आहेत. त्यामध्ये ०१ न्यायनिर्णय प्रकरणामध्ये रुपये ९०,०००/- एवढा दंड आकारण्यात आला आहे.

तसेच, राज्यात ०१ एप्रिल, २०२५ ते ३१ जानेवारी, २०२६ या कालावधीत अन्नपदार्थांचे लेबल मधील Nutritional Information बाबत उल्लंघन झालेली ३१ प्रकरणे आढळली असून त्यापैकी २९ न्यायनिर्णय प्रकरणी रुपये ७,२५,०००/- एवढा दंड आकारण्यात आला आहे. तसेच ०२ प्रकरणी न्यायनिर्णय अर्ज दाखल करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. विलास आठवले**
**सचिव-३,**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.